





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. १६.०६.२०२६ | अंक नं. ०६५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020







# झोपेत असलेल्या तरुणाची कुऱ्हाडीने वार करून हत्या; पत्नीवरही 'जीवघेणा हल्ला'

## नगर-कल्याण रोडवर पहाटेच्या वेळी थरार, हल्लेखोरांच्या शोधासाठी पोलिस पथके रवाना

नगर - नगर-कल्याण रोड परिसरातील जाधव मळा भागात एका अज्ञात इसमाने झोपेत असलेल्या तरुणावर कुऱ्हाडीने वार करून निर्घृण हत्या केल्याची घटना समोर आली आहे. या भीषण हल्ल्यात त्याची पत्नी देखील गंभीर जखमी झाली आहे. लक्ष्मण उर्फ लक्ष्या मार्तंड काळे (वय ३०) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. ही घटना १६ जून रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत रूपाली लक्ष्मण काळे (वय २८, रा. मु.पो. काळेगाव, ता. शेवगाव) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी आणि त्यांचे पती लक्ष्मण उर्फ लक्ष्या मार्तंड काळे (वय ३०) हे मुळचे शेवगाव तालुक्यातील असून कामानिमित्त नगर-कल्याण रोडवरील जाधव मळा येथील एका शेडमध्ये वास्तव्यास होते. दोघे पती पत्नी झोपेत असताना १६ जून रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास अज्ञात इसमाने झोपेत असलेल्या लक्ष्मण काळे यांच्या तोंडावर कुऱ्हाडीने वार करून त्यांची हत्या केली. एवढेच नव्हे तर, हल्लेखोराने फिर्यादी रुपाली काळे यांच्यावरही जीवघेणा हल्ला केला.

या घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलीस ठाण्याचे पथक आणि वरिष्ठ अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अप्पर पोलिस अधिक्षक वैभव कलुबर्मे, शहर विभागाचे पोलिस उपअधिक्षक डॉ. दिलीप टिपरसे, कोतवालीचे पो.नि. नितीन देशमुख यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी भेट देत पाहणी केली. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता फॉरेन्सिक लॅब आणि फिंगरप्रिंट स्कॉडला पाचारण करण्यात आले असून, तपासाला गती देण्यात आली आहे. हल्लेखोरांच्या शोधासाठी कोतवाली पोलिसांचे गुन्हे शोध पथक तसेच स्थानिक गुन्हे शाखेची वेगवेगळी पथके तयार करून तपास सुरु करण्यात आला आहे. लक्ष्मण काळे यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे पाठवण्यात आला आहे.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३(१) आणि १०९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हल्लेखोर कोण होता आणि त्याने हे कृत्य कोणत्या कारणासाठी केले, याचा पोलीस कसून तपास करत आहेत. पो.नि. नितीन देशमुख हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.









जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# कोयता बाळगणाऱ्या तरुणाला भिंगारमध्ये पोलिसांनी पकडले; गुन्हा दाखल

नगर – भिंगार शहरात दहशत पसरवण्याच्या उद्देशाने धारदार कोयता बाळगणाऱ्या एका तरुणाला भिंगार कॅम्प पोलिसांनी पकडले आहे. गौतम बुद्ध जॉगिंग पार्क परिसरात ही कारवाई करण्यात आली आहे. आयन समिर पठाण (वय २१, रा. अक्सा मशीद समोर, आलमगीर) असे पकडलेल्या तरुणाचे नाव आहे.

भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली होती की, गौतम बुद्ध जॉगिंग पार्कजवळ एक तरुण संशयास्पद रित्या धारदार कोयता घेऊन फिरत आहे. ही माहिती मिळताच स.पो.नि. थोरात यांनी तात्काळ तपास पथकाला घटनास्थळी धाव घेण्याचे आदेश दिले.

पोलीस पथक घटनास्थळी पोहोचताच त्यांना लिंबाच्या झाडाखाली एक तरुण धारदार कोयता घेऊन संशयास्पद स्थितीत उभा असलेला दिसला. पोलिसांची चाहूल लागताच तो पळून जाण्याच्या तयारीत होता, मात्र सतर्क पोलिसांनी त्याला जागेवरच पकडले. त्याच्याकडील धारदार कोयता जप्त करून त्याबाबत विचारपूस केली असता, तो समाधानकारक उत्तरे देऊ शकला नाही.

पोलिसांनी अधिक चौकशी केली असता, त्याचे नाव आयन समिर पठाण (वय २१, रा. अक्सा मशीद समोर, आलमगीर)असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनमध्ये आर्म ॲक्ट (शस्त्र कायदा) कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबमे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात, पोलीस अंमलदार दीपक शिंदे, रवींद्र टकले, अहमद इनामदार, प्रमोद लहारे, कैलास शिरसाठ आणि महिला पोलीस अंमलदार किरण बर्वे यांच्या पथकाने केली आहे.

# पुणे येथून बुक केलेल्या कारचालकाला बंदुकीचा धाक दाखवून नगरमध्ये लुटले

## कारसह पैसे, सोन्याची अंगठीही केली लंपास; खोसपुरी शिवारातील घटना

नगर – पुणे येथून प्रवासी घेऊन निघालेल्या एका उबेर कार चालकाला भररस्त्यात बंदुकीचा धाक दाखवून लुटल्याची घटना नगर तालुक्यातील खोसपुरी शिवारात घडली आहे. चोरट्यांनी केवळ कार चालकाचे पैसे आणि सोन्याची अंगठीच लुटली नाही, तर त्याला बेदम मारहाण करून त्याची स्विफ्ट डिझायर कार देखील बळजबरीने चोरून नेली.

याबाबत विशाल सूर्यकांत कट्टीमनी (वय २५, रा. कोल्हेवाडी, सिंहगड रोड,जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे टूर आणि ट्रॅव्हल्सचा व्यवसाय करतात. ते आपल्या ताब्यातील स्विफ्ट डिझायर कार (क्र. एमएच १२ वाय बी ८४८१) द्वारे ऑनलाईन उबेर पवरून बुकिंग घेऊन पुणे येथील वाकडेवाडी एसटी स्टँडवरून मळेवाडी, शेवगाव येथे जाण्यासाठी ३ प्रवाशांना घेऊन निघाले होते.

प्रवास सुरू असताना, १४ जून रोजी पहाटेच्या सुमारास नगरच्या पुढे गेल्यावर खोसपुरी शिवार परिसरातील रिलॅक्स हॉटेलच्या पुढे १५० मीटर अंतरावर गाडी आली असता, गाडीतील एका प्रवाशाने लघवी करण्यासाठी गाडी थांबवण्यास सांगितली. चालकाने गाडी रस्त्याच्या कडेला थांबवली. तो प्रवासी लघवी करून पुन्हा गाडीत येऊन बसला. गाडी पुन्हा सुरू होताच, पाठीमागील सीटवर बसलेल्या अज्ञात इसमाने अचानक फिर्यादी विशाल यांच्या डोक्याला बंदूक (पिस्तूल) लावली. त्याचवेळी त्यांच्या शेजारी बसलेल्या इसमाने त्यांचे हात घट्ट पकडले आणि पाठीमागील दुसऱ्या इसमाने दोरी काढून फिर्यादीचे हात बांधून टाकले. एवढ्यावरच न थांबता, आरोपींनी फिर्यादीच्या डोक्यात कोणत्यातरी जड आणि टणक वस्तूने प्रहार करून गंभीर दुखापत केली आणि त्यांना चालत्या गाडीतून खाली ढकलून दिले.

यानंतर आरोपींनी गाडीतील रोख रक्कम, फिर्यादीच्या हातातील सोन्याची अंगठी आणि ५,७०,५०० रुपये किमतीची पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायर कार असा एकूण ऐवज बळजबरीने घेऊन घटनास्थळावरून पोबारा केला. या धक्कादायक प्रकारानंतर जखमी अवस्थेत चालकाने एमआयडीसी पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी, नगर ग्रामीण विभाग यांनी तात्काळ घटनास्थळाला भेट दिली.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे स.पो.नि. हेमंत थोरात हे करत आहेत. आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत.

भररस्त्यात घडलेल्या या घटनेमुळे महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



आर.टी.ओ. कार्यालयीन कर्मचारी संघटनेच्यावतीने विविध मागण्यांसाठी कामबंद आंदोलन सुरु करण्यात आले.

# आर.टी.ओ. कर्मचाऱ्यांचा 'बेमुदत संप' सुरु

नगर – महाराष्ट्र राज्य आर.टी.ओ. कार्यालयीन कर्मचारी संघटनेने आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी १६ जून पासून बेमुदत संप पुकारला आहे. या संपात अहिल्यानगर आर. टी. ओ. कार्यालयातील कर्मचाऱ्यांनीही सक्रीय सहभाग घेत काटेकोरपणे संप पाळला. त्यामुळे कार्यालयात पूर्णपणे शुकशुकाट पसरला होता. दरम्यान येथील आर.टी.ओ. कार्यालयासमोर कर्मचाऱ्यांनी सकाळी निर्दशने करून घोषणाबाजी केली.

आर.टी.ओ. कर्मचाऱ्यांनी आपल्या खात्यांतर्गत अनेक मागण्यांसाठी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी अशा २३ पदांचे पदोन्नती प्रस्ताव मंत्रालय स्तरावर प्रलंबित आहेत. या पदांची तात्काळ पदोन्नती व्हावी, कार्यालय अधीक्षक पदांचे सेवाप्रवेश नियम नाहीत. त्यामुळे या पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करावेत, सहाय्यक मोटार वाहन अभियंता पदांसाठी विधी पदवीधरांची नियुक्ती करण्यात यावी, त्यासाठी सेवाप्रवेश नियम लागू करावेत, वर्ग ३ संवर्गातील सेवाप्रवेश नियम लागू करावेत, लिपिक पदांचे नामकरण परिवहन सहाय्यक करावे, आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अद्याप दिलेले नाहीत. ते तातडीने देण्यात यावेत, अशा मागण्यांसाठी आर.टी.ओ. कर्मचाऱ्यांनी बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनात अहिल्यानगर येथील आर.टी.ओ. कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी सक्रीय सहभाग घेतला. यामध्ये राजेंद्र तेजाळे, कैलास मिसाळ, प्रसाद बारगळ, रतन कासार, विशाल साळवे, सारंग पाटील, वैभव गावडे, तुषार इंगळे, राजेंद्र गरड, नितीन बेलदार आणि पांडुरंग बडे आदींचा समावेश आहे. आरटीओ कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनीही पाठिंबा दर्शविला.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, उपाध्यक्ष पेद्राम, उपाध्यक्ष विजय काकडे आणि उपाध्यक्ष आडेप आदी उपस्थित होते.

## नगर–कल्याण रोडवर रेल्वे उड्डाणपुलावर भीषण अपघातात एकाचा जागीच मृत्यू

नगर – नगर–कल्याण रोडवरील रेल्वे उड्डाणपुलावर झालेल्या एका भीषण अपघातात एका ५६ वर्षीय व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. बाळासाहेब शंकर शिंदे (रा. सुतारमळा, जामगाव, ता. पारनेर) असे या मृत व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात १५ जून रोजी सकाळी ११:३० च्या सुमारास घडला. अपघातानंतर बाळासाहेब शिंदे यांना गंभीर जखमी अवस्थेत त्यांचे नातेवाईक गणेश अर्जुन शिंदे यांनी तातडीने रुग्णवाहिकेतून अहिल्यानगर येथील 'सिव्हील हॉस्पिटल'मध्ये उपचारासाठी दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गायकवाड करत आहेत.

# स्थानिक गुन्हे शाखेच्या प्रभारीपदी पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे


नगर – स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) प्रभारीपदी शेवगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी १५ जून रोजी याबाबत आदेश जारी केले. एलसीबीचे प्रभारी पोलीस निरीक्षक किरण कबाडी यांची गेल्या मागील आठवड्यात बदली झाल्यानंतर या पदावर कोणाची नियुक्ती होणार याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले होते. अखेर अनुभवी अधिकारी म्हणून ओळख असलेल्या संतोष मुटकुळे यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

किरण कबाडी यांची एलसीबीच्या प्रभारीपदावरून अवघ्या ११ महिन्यांत बदली करण्यात आली होती. त्यांच्या बदलीनंतर सहायक पोलीस निरीक्षक हरीष भोये यांच्याकडे तात्पुरता पदभार देण्यात आला होता. मात्र एलसीबीच्या कायमस्वरूपी नेतृत्वाबाबत सुरू असलेल्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला. संतोष मुटकुळे यांना जिल्ह्यातील पोलीस कामकाजाचा चांगला अनुभव आहे. त्यांनी यापूर्वी पाथर्डी पोलीस ठाण्याचे प्रभारी म्हणून दोन वर्षे काम केले असून गेल्या वर्षभरापासून ते शेवगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी होते. त्याआधी त्यांनी ठाणे शहर, नवी मुंबई, नाशिक आणि चंद्रपूर येथे विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. पाथर्डी आणि शेवगाव येथील त्यांच्या कामगिरीची दखल घेत पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी त्यांच्यावर एलसीबीची धुरा सोपविली आहे.

नव्याने जिल्ह्यात रूजू झालेले पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांची श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी असलेले पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांची अकोले पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्याकडे कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच अकोले पोलीस ठाण्याचे प्रभारी मोहन बोरसे यांची शेवगाव पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली असून नव्याने जिल्ह्यात दाखल झालेले पोलीस निरीक्षक उध्दव डमाळे यांना कोपरगाव शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

## रमेशराव अनभुले यांचे अल्प आजाराने निधन

नगर – सेवानिवृत्त उपअभियंता रमेशराव रुपचंद अनभुले



(वय ६९) यांचे १५ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १६ जून रोजी नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दत्ता सप्रे यांचे ते मेहूणे होत. दिलीप मिस्कीन यांचे ते साडू होत.

## रोहन बारस्कर याचे अल्प आजाराने निधन

नगर – बारस्कर मळा, नागापूर येथील रहिवासी रोहन उर्फ



बंटी बारस्कर (वय २९) यांचे १३ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नागापूर स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आजोबा, आई, पत्नी, भाऊ, भावजय, १ बहीण, मेहूणे असा परिवार आहे. माजी नगरसेवक स्व. पोपटराव बारस्कर यांचे ते धाकटे चिरंजीव होत.

## छाया शिंदे यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर – शहरातील कल्याण महामार्गावरील शिवाजीनगर



परिसरातील रहिवासी व जिल्हा रुग्णालयातील वरिष्ठ परिचारिका छाया शिंदे (वय ४३) त्यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे पती, सासू, मुली कादंबरी व काव्यांजली असा परिवार आहे. जिल्हा शासकीय रूग्णालयातील न्याय वैद्यकीय प्रकरण (एमएलसी) विभाग प्रमुख कैलास काशिनाथ शिंदे यांच्या त्या पत्नी होत.

## सुलोचना भोर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नागापूर येथील सुलोचना लहानू भोर (वय ७५) यांचे १२ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, तीन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्या ताई नावाने परिचित होत्या. त्या धार्मिक व मनमिळावू स्वभावाच्या होत्या.

## लक्ष्मण शिरसाठ यांचे अल्प आजाराने निधन

नगर – शिरसाठवाडी पाथर्डी येथील रहिवासी लक्ष्मण मनाजी



शिरसाठ (वय ८६) यांचे १५ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, ४ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

डॉ. दिपक शिरसाठ, राम शिरसाठ व मंगल दराडे, आशा दराडे, शोभा सानप, वैशाली खाडे यांचे ते वडील होत.



गावठी दारूची वाहतूक करणारी गाडी पकडल्यानंतर आरोपीसमवेत राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पथक.

# गावठी दारूची वाहतूक करणारी गाडी पकडली

## राज्य उत्पादन शुल्क विभाग व नगर तालुका पोलिसांची संयुक्त कारवाई

नगर – राज्य उत्पादन शुल्क विभागाचे भरारी पथक आणि नगर तालुका पोलिसांच्या पथकाने अवैध गावठी दारू वाहतुकीवर धडक कारवाई करत एका आरोपीला अटक केली आहे. नगर–कल्याण रोडवर हॉटेल अमरज्योत समोर नेप्ती शिवार येथे ही कारवाई करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाने सापळा रचून अवैध दारू वाहतूक करणाऱ्या ओमिनी गाडीचा (क्र.एमएच १२ ए एक्स ६००१) पाठलाग केला. या कारवाईत संदीप ज्ञानेश्वर होले (वय ३९, रा. नेप्ती, ता. नगर) या आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

त्याच्या ताब्यातून मारुती सुझुकी ओमिनी गाडी आणि ३५ लिटर क्षमतेच्या ६ प्लास्टिक कॅनमध्ये भरलेली एकूण २१० लिटर गावठी दारू. असा एकूण ३ लाख २२ हजार ८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी संदीप होले याच्या विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक प्रमोद सोनोने, ऋषिकेश इंगळे, उपअधीक्षक प्रविणकुमार तेली यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक सुरज कुसळे, दुय्यम निरीक्षक आनंद जावळे, श्रुष्टी भागवत आणि जवान सुरज पवार, सुनील निमसे, चतुर पाटोळे, सिद्धांत गिरीगोसावी, महिला जवान सुनंदा अकोलकर तसेच नगर तालुका पोलीस स्टेशनचे हवालदार एस. बी. जायभाय यांनी केली. या गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक आनंद जावळे करत आहेत.

अवैध मद्य निर्मिती, वाहतूक आणि विक्री करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही सातत्याने कारवाई केली जाणार असल्याचे निरीक्षक सुरज कुसळे यांनी स्पष्ट केले आहे. तसेच, नागरिकांनी अवैध दारू संदर्भात माहिती किंवा तक्रार असल्यास टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ किंवा व्हॉट्सप क्रमांक ८४२२००११३३ वर संपर्क साधावा.

# महिलेच्या घरासमोर अश्लिल कृत्य करणाऱ्या आरोपींना ठोकल्या बेड्या



महिलेच्या घरासमोर अश्लील साहित्य ठेवणाऱ्या आरोपींना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत तोफखाना पोलिसांचे पथक.

नगर – महिलेच्या घरासमोर अश्लील साहित्य ठेवून विनयभंग करणारे ३ आरोपी तोफखाना पोलिसांनी पकडले आहेत. विनोद मधुकर त्रिभुवन (वय ४३), हर्ष सुनिल शेलार (वय १८) व एक अल्पवयीन मुलगा (तिघे रा.सिध्दार्थनगर, म्युन्सीपल कॉलनी, अहिल्यानगर) अशी त्यांची नावे आहेत.

यातील पिडीत महिला ही १० जून रोजी रात्री सिध्दार्थनगर येथील राहत्या घरी तिच्या पती व मुलासह घरात झोपलेली होती. मध्यरात्री १२.३० च्या सुमारास पिडीत महिलेस तिच्या घरासमोरील ओट्यावर काही तरी पडल्याचा आवाज आल्याने पिडीताने घराचा दरवाजा उघडुन पाहिले असता दारामध्ये एक कागदी मोरपंखी रंगाचा बॉक्स पडलेला होता. यातील पिडीत महिला व तिच्या घरातील सदस्यानी सदरचा बॉक्स उघडुन पाहीला असता त्यामध्ये अश्लील साहित्य होते. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हा दाखल होताच पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांनी गुन्ह्याची माहिती घेवुन सदरचा गुन्हा हा स्त्री अत्याचारासंबधीत असल्याने गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांना आरोपीचा शोध घेण्याबाबत सुचना दिल्या. त्याअनुषंगाने लागलीच पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन गुन्ह्यातील मुख्य आरोपी विनोद मधुकर त्रिभुवन यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा हा त्याचे साथीदार हर्ष सुनिल शेलार व १ अल्पवयीन मुलगा यांच्या सोबत केल्याचे सांगितले आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षकबालाजी वैद्य यांच्या गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर, पोलीस अंमलदार नितिन उगलमुगले, अरुण गांगुर्डे, भानुदास खेडकर, अब्दुलकादर इनामदार, सुधीर खाडे, सुरज वाबळे, पो.कॉ सुमित गवळी, अविनाश बर्डे, सतिष त्रिभुवन, सुजय हिवाळे, भागवत बांगर, सतिष शिंदे, शाकीर सय्यद, बाळासाहेब भापसे, कपिल गायकवाड, म.पो.ना जिजाबाई खुडे, म.पो.कॉ कल्पना अवसरे यांच्या पथकाने केली आहे.

# मैत्रीचा बहाणा करून विश्वासघाताने दागिने पळवणारी टोळी जेरबंद

नगर – मैत्रीचा केवळ बहाणा करायचा, समोरच्याचा विश्वास जिंकायचा आणि ऐनवेळी विश्वासघात करून लाखो रुपयांचे दागिने घेऊन पोबारा करायचाअशाच एका हायप्रोफाईल आणि अट्टल भामट्यांच्या टोळीला एम.आय.डी.सी. पोलिसांनी अत्यंत शिताफीने गजाआड केले आहे. या टोळीकडून पोलिसांनी तब्बल ९ लाख १५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून, यामध्ये सोन्याचे दागिने आणि महागड्या मोबाईलचा समावेश आहे.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी अनिता गणेश नजन हिने नगरमधील दोन महिलांशी अत्यंत जवळीक साधून मैत्री केली होती. यामध्ये सौ. वनिता परसराम नवले (वय ३३ वर्षे, रा.पिंपळे कॉलनी,नागापूर) आणि सौ.अंजुम रफिक तांबोळी (वय ४५ वर्षे, रा. प्रेमभारतीनगर, बोल्हेगाव) या दोन गृहिणींचा समावेश होता.अनिताने या दोन्ही मैत्रिणींचा विश्वास संपादन केला. त्यानंतर,एका लग्नात घालण्यासाठी मला दागिन्यांची गरज आहे, असे खोटे कारण सांगून तिने वनिता नवले यांच्याकडून साडेतीन तोळे वजनाचे सोन्याचे दागिने आणि अंजुम तांबोळी यांच्याकडून अडीच तोळे वजनाचे सोन्याचे दागिने मागून घेतले .मात्र, दागिने हातात पडताच अनिताने ते परत न करता दोन्ही मैत्रिणींचा विश्वासघात केला आणि ती दागिने घेऊन फरार झाली.

याप्रकरणी फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित महिलांनी धाव घेतली. एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात २४ मे २०२६ रोजी भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी स.पो.नि.हेमंत थोरात यांनी तपासासाठी तात्काळ पथके रवाना केली.आरोपी अत्यंत हुशार होते. गुन्हा केल्यानंतर त्यांनी आपले मूळ ठाणे सोडले आणि ओळख पटू नये म्हणून सतत मोबाईल फोन तसेच विविध कंपन्यांची सिमकार्ड बदलून पोलिसांना गुंगारा देण्याचा प्रयत्न केला.त्यांचा कोणताही सुगावा लागत नव्हता. मात्र,पोलीस पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे दिवस–रात्र मेहनत घेतली. अखेर पोलिसांनी या टोळीचा शोध लावून ४ जणांना बेड्या ठोकल्या. अनिता गणेश नजन (वय ४०, रा. गणेश पार्क कॉलनी, बोल्हेगाव फाटा), वैष्णवी गणेश नजन (वय २२, रा.बोल्हेगाव फाटा), गणेश परसराम नजन (वय ४८, रा.बोल्हेगाव फाटा), बन्यामीन जोसेफ बोरुडे (वय २६, रा. खारे कर्जुने, ता.नगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी अटक केलेल्या या आरोपींकडून ८ लाख ४०हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, ७५ हजार रुपये किमतीचे विविध कंपन्यांचे ५ महागडे मोबाईल आणि सिमकार्ड्स असा एकूण ९ लाख १५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल शैलेश रोहोकले हे करत आहेत. ही कारवाई स.पो.नि. हेमंत थोरात,सफौ. राकेश खेडकर, पोहेकॉ. शैलेश रोहोकले, पोहेकॉ. देविदास खेडकर, पोकॉ. दिपक फुंदे, पोकॉ. नवनाथ दहिफळे, पोकॉ. किशोर जाधव, मपोकॉ. पुनम नरसाळे, मोबाईल सेल चे पोलीस अंमलदार राहुल गुंडू आणि पोकॉ. अरुण सांगळे यांनी केली आहे.

# जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त शहरात जनजागृती




जागतिक बालकामगार विरोधी दिनाचे औचित्य साधून अहिल्यानगर शहरात बालकामगार प्रथा निर्मूलन व बालहक्क संरक्षणाबाबत व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात आले.

नगर – जागतिक बालकामगार विरोधी दिनाचे औचित्य साधून अहिल्यानगर शहरात बालकामगार प्रथा निर्मूलन व बालहक्क संरक्षणाबाबत व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियानाचे प्रारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते माहिती पत्रकाचे अनावरण करुन करण्यात आले. या अभियानाचे आयोजन कामगार विभाग, चाईल्ड लाईन, विपला फाउंडेशन तसेच विविध शासकीय विभागांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

जागतिक बालकामगार विरोधी दिन हा बालकांच्या हक्कांचे संरक्षण, त्यांना शिक्षणाचा अधिकार मिळवून देणे आणि बालशोषणाविरुद्ध समाजात जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरातील विविध सार्वजनिक ठिकाणी नागरिक, प्रवासी, कर्मचारी व अधिकारी यांच्यामध्ये जनजागृती करण्यात आली.

आ. संग्राम जगताप म्हणाले की, बालकामगारमुक्त समाज निर्मितीसाठी सर्व घटकांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे. तसेच बालकांचे शिक्षण, आरोग्य, सुरक्षा आणि सर्वांगीण विकास यासाठी समाजातील प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारण्याचे त्यांनी आवाहन केले.

या उपक्रमाची सुरुवात अहिल्यानगर रेल्वे स्थानक परिसरातून करण्यात आली. यावेळी कामगार विभागाचे अधिकारी, लोहमार्ग पोलीस, चाईल्ड लाईनचे प्रतिनिधी तसेच विपला फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. रेल्वे स्थानकावर येणाऱ्या–जाणाऱ्या प्रवाशांना बालकामगार प्रथेचे दुष्परिणाम, बालकांचे कायदेशीर हक्क, बालमजुरी रोखण्यासाठी नागरिकांची भूमिका याबाबत माहिती देण्यात आली. तसेच बालकामगार आढळून आल्यास संबंधित यंत्रणांना तत्काळ कळविण्याचे आवाहन करण्यात आले.

यानंतर पुणे बसस्थानक परिसरात बस नियंत्रण कक्षातील कर्मचारी, वाहतूक कर्मचारी, प्रवासी आणि सर्वसामान्य नागरिक यांच्या सहभागातून जनजागृती करण्यात आली. बसस्थानकासारख्या गर्दीच्या ठिकाणी अनेक वेळा बालमजुरी, बालशोषण व बालतस्करीची प्रकरणे आढळून येतात. त्यामुळे अशा प्रकारच्या घटनांबाबत सतर्क राहण्याचे आवाहन उपस्थितांना करण्यात आले.

याशिवाय अहिल्यानगर येथील कोतवाली पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक गायकवाड यांच्या उपस्थितीत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. बालकामगार, बालशोषण व बालसुरक्षेसंदर्भातील कायदेशीर तरतुदींबाबत माहिती देण्यात आली. पोलीस प्रशासन आणि सामाजिक संस्थांच्या समन्वयातून बालहक्क संरक्षणासाठी प्रभावी कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. बाल कल्याण समिती, अहिल्यानगर येथे समितीचे अध्यक्ष ओहोळ यांच्या समवेत जनजागृती करण्यात आली. बालकांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत असलेल्या विविध यंत्रणांच्या भूमिकेबाबत माहिती देण्यात आली. बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय कदम यांच्या उपस्थितीतही जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त विशेष जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. महिला व बाल विकास विभागाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली तसेच बालहक्कांच्या संरक्षणासाठी शासन व स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त प्रयत्नांचे महत्त्व सांगण्यात आले.

या सर्व कार्यक्रमांद्वारे बालपण शिक्षणासाठी आहे, कामासाठी नाही, बालकामगारमुक्त भारत हीच खरी प्रगती आणि प्रत्येक बालकाला शिक्षण, संरक्षण व सन्मानाचा हक्क असे संदेश देण्यात आले. नागरिकांनी बालकामगार प्रथा रोखण्यासाठी पुढाकार घ्यावा, बालहक्कांचे उल्लंघन होत असल्यास संबंधित यंत्रणांना माहिती द्यावी आणि बालकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या अभियानात कामगार विभाग, चाईल्ड लाईन, विपला फाउंडेशन, लोहमार्ग पोलीस, कोतवाली पोलीस स्टेशन, बाल कल्याण समिती, महिला व बाल विकास विभाग तसेच विविध क्षेत्रांतील अधिकारी, कर्मचारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला.

# प्रेरणादायी अक्षरधन

## आत्मविश्वासाचा दागिना







स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल बाळगावा विश्वास, मग कधीच होणार नाही दुष्टांचा त्रास. सदैव घ्याल सुखाचा श्वास. पण त्यासाठी पाळायची आहेत काही पथ्ये. विदुरनीतीत सांगितली आहेत ती,

तुझा क्रोध शत्रूंच्या प्रगतीला ठरावा अवरोध. तुझ्याशी वैर घेणे परवडणारे नाही, याचा घ्यावा त्यांनी बोध. शत्रूंच्या मर्मस्थानाचा सदैव घेत राहावा शोध. मग आनंदाचा सतत वाहील ओघ. तुझ्या त्या आनंदाला पाहून देखील धडकी भरावी शत्रूच्या काळजात. नाइलाजाने का असेना, पण तुझ्या शत्रूलाही सहभागी व्हावे लागावे तुझ्या आनंदात. पण तेवढ्याने हुरळून जाऊ नकोस. सतत वागत राहा आत्मविश्वासाने. उद्योग व त्यातून मिळणारे धन, यापेक्षाही अधिक किंमतीचा आहे आत्मविश्वास. तो पाहून दिपू देत डोळे जगाचे. पाहून तुझा तो आत्मविश्वासाचा दागिना. सचोटी, इतरांचे कल्याण साधण्याची भावना आणि भगवंताचे अधिष्ठान. या हिऱ्या–मोत्यांमुळे त्या तुझ्या दागिन्याची सर कुणा येईना. बघ मग सोनेच सोने पिकेल. अंगणात सुखाची रास लागेल. शांती, समाधान व आनंद तुझ्या कुटुंबासहित सर्व संबंधितांना लाभेल. तुझ्यावर अभिनंदनाचा वर्षाव करील.'

संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराजांबद्दल बोलले, तसे दुनियेने तुझ्याबद्दल मग बोलावे.

'बा माणसा!, ज्ञानेश्वर माउलींचा आशीर्वाद लाभू दे आणि तुझ्या श्रमाने, सचोटीने व आत्मबलाने तुझ्या दारी सोन्याचा पिंपळ उभा होऊ दे. ज्ञानेश्वरांनी अडाण्यांनाही ज्ञानी केले. तूही या संपत्तीच्या जोरावर ज्ञानाचा प्रसार कर. जे सज्जन आहेत, शुद्ध संकल्प करणारे आहेत, त्यांना हात दे. मग तुला सुखाची वाण कधी पडणार नही. मनाला समाधान आणि शांती सतत लाभल्याविना राहणार नाही. '

आपल्याला कुणी 'सवत असेल का? सतत सावधान राहून ते शोधावे. फसविले जाऊ नये, याकडे लक्ष द्यावे. एका लबाडाने दुर्बिणीतून पाहिले आणि लोकांना ओरडून सांगितले, की पाहा, सूर्यावर एक प्रचंड प्राणी अवतरलाय. तो विशालकाय प्राणी कधी पृथ्वीवर पडेल, याचा नेम नाही. आपण सगळे मरू त्यापायी. तेव्हा हा विनाश टाळण्यासाठी प्रयत्न करू या. लाखो रुपये लागतील त्या प्राण्याला सूर्यावरून नष्ट करून टाकायला. असे म्हणून त्याने लोकांनाही दुर्बिणीतून तो प्राणी दाखवला. लोक हवालदिल झाले. पैसे गोळा करून द्यायला घरोघरी फिरू लागले.

एका शहाण्याने मात्र पैसे देण्याचे नाकारले. उलट सगळ्या गावकऱ्यांना अभय दिले. 'मी पैसे न घेताच तो प्राणी नष्ट करतो.' असे सांगितले आणि खरोखरच तसे केले. कारण दुर्बिणीतून दिसणारा प्रचंड प्राणी सूर्यावर नव्हता. दुर्बिणीच्या काचेवर चिकटवला होता. ती होती एक माशी, दुर्बिणीमुळे दिसली प्रचंड मोठी. – **किशोर गांधी**

# कै. गुरुवर्य पोट्यन्ना बत्तीन शैक्षणिक आणि सामाजिक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड

## अध्यक्षपदी नारायण मंगलारम व सचिवपदी श्रीनिवास यल्लारम



नगर – शहरात शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या कै. गुरुवर्य पोट्यन्ना बत्तीन शैक्षणिक व सामाजिक मंडळाच्या सदस्यांची नुकत्याच पार पाडलेल्या सभेत नूतन पदाधिकाऱ्यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. या सभेत मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा. बाळकृष्ण सिद्दम यांनी राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते नारायण मंगलारम यांची अध्यक्षपदासाठी सूचना केली. तसेच मंडळाचे माजी सचिव प्रा. बाळकृष्ण गोटीपामूल यांनी श्रीनिवास यल्लारम यांची सचिव पदासाठी सूचना केली. उपस्थित सदस्यांनी एकमताने या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीला सहमती दर्शवली.

तसेच यावेळी उपाध्यक्षपदी सदाशीव बत्तीन, विनायक बत्तीन, कार्याध्यक्षपदी ज्ञानेश्वर मंगलारम, सहसचिव कृष्णा संभार, खजिनदारपदी शंकर नक्का, हिशोब तपासनीसपदी भुमय्या नक्का यांची नियुक्ती करण्यात आली. संस्थेच्या वतीने दरवर्षी ५ सप्टेंबर शिक्षक दिन व पदवीधर विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ साजरे केले जातात. तसेच इतर शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविले जातात.

# १७ जूनपासून पुणे–साईनगर शिर्डी एक्सप्रेस धावणार

## अहिल्यानगर स्थानकावर खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते हिरवा झेंडा



नगर – पुणे, अहिल्यानगर आणि साईनगर शिर्डी परिसरातील लाखो प्रवासी, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणारी पुणे–साईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वे सेवा १७ जून पासून सुरू होत आहे. या रेल्वे सेवेचा शुभारंभ पुणे येथे केंद्रीय रेल्वेमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार असून, त्याचवेळी अहिल्यानगर रेल्वे स्थानकावर खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते रेल्वेला हिरवा झेंडा दाखविण्यात येणार आहे.

मध्य रेल्वेचे महाप्रबंधक राजीव श्रीवास्तव यांनी याबाबत खासदार नीलेश लंके यांना पत्राद्वारे माहिती दिली असून, मध्य रेल्वेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे निमंत्रणही देण्यात आले आहे.

पुणे–साईनगर शिर्डी या थेट रेल्वे सेवेच्या प्रारंभामुळे पुणे, अहिल्यानगर आणि शिर्डी दरम्यानची वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे. या मार्गावरील प्रवाशांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि वेळेची बचत करणारा पर्याय उपलब्ध होणार असून, दैनंदिन प्रवास करणारे नागरिक, शैक्षणिक कारणांसाठी ये–जा करणारे विद्यार्थी तसेच व्यावसायिक वर्गाला याचा मोठा लाभ मिळणार आहे. विशेषतः साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीकडे जाणाऱ्या भाविकांसाठी ही रेल्वे सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या नव्या रेल्वे सेवेच्या माध्यमातून धार्मिक पर्यटनाला चालना मिळण्याबरोबरच पुणे, अहिल्यानगर आणि शिर्डी परिसरातील व्यापार, उद्योग, पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. रेल्वे संपर्क अधिक सक्षम झाल्याने या भागातील आर्थिक आणि सामाजिक विकासाला नवे परिमाण प्राप्त होणार असल्याचे मानले जात आहे.

अहिल्यानगर जिल्ह्याला पुण्याशी अधिक प्रभावी रेल्वे संपर्क उपलब्ध व्हावा तसेच धार्मिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांना जोडणाऱ्या रेल्वे सेवांचा विस्तार व्हावा, यासाठी खासदार नीलेश लंके यांनी संसदेत आणि विविध स्तरांवर सातत्याने पाठपुरावा केला होता. रेल्वे मंत्रालय, रेल्वे बोर्ड आणि मध्य रेल्वे प्रशासनाकडे त्यांनी वेळोवेळी या मार्गावरील रेल्वे सेवेची आवश्यकता अधोरेखित केली होती.

याशिवाय संसदेतील चर्चांपासून ते रेल्वे समित्यांच्या बैठका, वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबतच्या चर्चासत्रे आणि रेल्वेमंत्र्यांना दिलेल्या निवेदनांमधून अहिल्यानगर जिल्ह्यासाठी नवीन रेल्वे सेवा, प्रवासी सुविधांमध्ये वाढ आणि तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या मार्गांना प्राधान्य देण्याची मागणी त्यांनी सातत्याने मांडली होती.

या सर्व प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर पुणे–साईनगर शिर्डी एक्सप्रेसचा प्रारंभ हा अहिल्यानगर जिल्ह्याच्या रेल्वे विकासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली प्रवाशांची मागणी पूर्ण होत असल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, या रेल्वे सेवेचे सर्व स्तरांतून स्वागत केले जात आहे.

# मातृतीर्थ सिंदखेड राजा ते पाचाड (रायगड) अभिवादन

## यात्रेचे मराठा नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने स्वागत



नगर – राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतीदिनानिमित्त सिंदखेड राजा (जन्मस्थळ) ते पाचाड (स्मृतीस्थळ) अशी अभिवादन यात्रेचे नगरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे मराठा नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने स्वागत करण्यात आले. याप्रसंगी पतसंस्थेचे ज्येष्ठ संचालक ज्ञानदेव पांडूळे, बाळकृष्ण काळे, व्हाईस चेअरमन उदय अनभुले, सतिश इंगळे, संयोजक द्वारकाधीश राजेभोसले, लक्ष्मण सोनाळे, अच्युत गाडे, अशोक वारकड, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, मराठा सेवा संघाचे दक्षिण जिल्हाध्यक्ष प्रविण दहातोंडे, ओम इंगळे, हर्षल म्हस्के, अ‍ॅड. गजेंद्र दांगट, अशोक कुटे, अतुल लहारे, राजेंद्र निबाळकर, राजेंद्र म्हस्के, डॉ. समीर कोकाटे, प्रशांत नगरकर, राजेंद्र उदागे, श्रीपाद दगडे, इंजि. श्रीकांत निबाळकर, अमोल राजे भोसले, नगरसेवक गणेश कवडे, अजय चितळे, अनुराधा येवले, मनीष रोहकले, सोनू चोधरी, कोमल ठुबे, अमोल लहारे आदी उपस्थित होते. यावेळी या यात्रेचे मुख्य आयोजक व जिजाऊंचे वंशज शिवाजीराजे जाधव यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

यावेळी व्हाईस चेअरमन उदय अनभुले म्हणाले, माँ जिजाऊ यांचे कार्य सर्वपरिचित आहे, छत्रपती शिवाजी महाराजांना घडविण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. रयतची काळजी घेणाऱ्या आणि दुष्मानांनाही घाम फोडणारे असे त्यांचे व्यक्तीमत्व होते. त्यांच्या स्मृती सर्वांच्या मनात कायम रहावे, यासाठी जयंती व स्मृतीदिनी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. जन्मस्थळ ते स्मृतीस्थळ अशा या अभिवादन यात्रेमुळे त्यांचे कार्य अधिक व्यापक होईल, असे सांगितले.

१७ जून राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचा स्मृतिदिन याचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यंदाही अभिवादन यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा नगरमध्ये आली असता छत्रपती शिवाजी महाराज चौक, एस. टी. स्टॅन्ड, नगर येथे महाराजांना अभिवादन करून यात्रा पुढे मार्गस्थ झाली.

यावेळी मोठया प्रमाणावर शिवशंभु भक्त व मराठा सेवा संघ, मराठा पतसंस्था, राजमाता जिजाऊ प्रतिष्ठान आदीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# १६८ वेळा रक्तदान करणारे अशोक भालके यांचा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने २० जूनला सन्मान



नगर – रक्तदान हेच श्रेष्ठ दान मानले जाते. या विचाराला आयुष्यभर कृतीतून जपणारे आणि तब्बल १६८ वेळा रक्तदान करून समाजात रक्तदानाबाबत जनजागृती निर्माण करणारे अशोक भालके यांना 'महाराष्ट्र भूषण २०२६' पुरस्कार जाहीर झाला आहे. पुणे येथील अल्बोस टेक्नॉलॉजी यांच्या सौजन्याने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, २० जून रोजी पुणे येथे आयोजित विशेष सोहळ्यात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते भालके यांचा गौरव केला जाणार आहे.

कार्यक्रमाचे संयोजक रोहित गांधी यांनी ही माहिती दिली. भालके यांच्या दीर्घकालीन समाजसेवेची आणि रक्तदान क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत पुरस्कार निवड समितीने त्यांची निवड केली. मूळचे चांदा (ता. नेवासा) येथील रहिवासी असलेले अशोक भालके हे जिल्हा परिषद आरोग्य विभागातून सेवानिवृत्त झाले आहेत. शासकीय सेवेत कार्यरत असतानाच त्यांनी समाजसेवेचा वसा जपला. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेवर मदत मिळावी, रक्तदानाबाबत असलेले गैरसमज दूर व्हावेत आणि तरुणांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान चळवळीत सहभागी व्हावे यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

भालके यांनी केवळ स्वतः रक्तदान करण्यापुरते कार्य मर्यादित न ठेवता विविध गावांमध्ये, शैक्षणिक संस्थांमध्ये आणि सामाजिक संघटनांच्या माध्यमातून रक्तदान शिबिरे, जनजागृती कार्यक्रम तसेच मार्गदर्शन उपक्रम राबविले. पुणे येथे होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी साहित्यिक सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी, सिने अभिनेत्री माधुरी पवार, पै. नाना डोंगरे, आशू सुरपूर, संदीप रासकर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात समाजसेवा, शिक्षण, कला, साहित्य आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात येणार आहे.

# अहिल्यानगरमध्ये २० जून रोजी 'महाराष्ट्र आयकॉन अ‍ॅवॉर्ड्स वितरण




नगर – आष्टी तालुका युवा पत्रकार संघ, आष्टी (जि. बीड) यांच्या वतीने राज्यस्तरीय 'महाराष्ट्र आयकॉन अवॉर्ड्स २०२६' सोहळ्याचे अहिल्यानगर येथे आयोजन करण्यात आले आहे. विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय व समाजोपयोगी कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना या सोहळ्यात राज्यस्तरीय सन्मानाने गौरविण्यात येणार असल्याची माहिती संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी दिली. हा पुरस्कार वितरण सोहळा २० जून रोजी सकाळी ११ वाजता हॉटेल मेघनंद लॉन्स अ‍ॅण्ड रेस्टॉरंट, सावेडी, मनमाड रोड, अहिल्यानगर येथे होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आष्टी–पाटोदा–शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस हे राहणार असून, प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार संग्राम जगताप, आमदार काशिनाथ दाते, आमदार अक्षय कर्डिले, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक सुरेश बनसोडे, संपत बारस्कर, ह.भ.प. महंत काशिनाथ महाराज तसेच सुधाताई कांकरिया यांची उपस्थिती लाभणार आहे. त्यांच्या हस्ते पुरस्कार विजेत्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, या माध्यमातून राज्यभरातील कर्तृत्ववान व्यक्तींना एक व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. समाजहितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करून नव्या पिढीला प्रेरणा देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष जावेद पठाण, सचिव गहिनीनाथ पाचबैल, समीर शेख, अक्षय विधाते, सोपान पगारे, अतुल जवणे, प्रेम पवळ, निसार शेख, राजेंद्र लाड, अ‍ॅड. किशोर निकाळजे, सय्यद बबलू, मनोज सातपुते, दादा पवळ, अमोल जगताप, अशोक कुताळ, आदिनाथ ठोंबरे, संतोष तांगडे, मारुती सत्रे, अतुल जाधव, किरण शिनगिरे, ओंकार कदम, संस्कार लाड, सचिन पवार, सागर दळवी, संदीप हाडे आदींनी परिश्रम घेतले.

# बोधगया महाबोधी महाविहार केंद्रीय कायदा पुस्तक प्रकाशन



बोधगया महाबोधी महाविहार केंद्रीय कायदा पुस्तकाचा प्रकाशन समारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन सीवुड नवीमुंबई येथे भदंत थेरो महेंद्र बोधी यांचे हस्ते झाला.

नगर – अ‍ॅड. दिलीप काकडे लिखित बोधगया महाबोधी महाविहार केंद्रीय कायदा पुस्तकाचा प्रकाशन समारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन सीवुड नवीमुंबई येथे १४ जून रोजी झाला. भदंत थेरो महेंद्र बोधी यांचे हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती, आयु. काशिनाथ कांबळे, हरिश्चंद्र पवार, दादासाहेब मर्चंडे, डॉ. मुकेश दुपारे, शशिकांत भालेराव, संदिप साबळे, अहिल्यानगर जिल्ह्याचे समन्वयक – भाऊसाहेब देठे, डॉ. अनिल ससाने, प्रा. विश्वासराव कांबळे, प्रा. साहेबराव गायकवाड यांची होती. पुस्तकाचे लेखक अ‍ॅड. दिलीप काकडे यांनी पुस्तकाचा विषय, उद्देश, स्वरुप, व वैशिष्ट्य याचे स्पष्टीकरण केले.

'बोधगया मंदिर कायदा, १९४९, हा राज्यस्तरीय कायदा रद्द करुन, त्या जागेवर बोधगया महाबोधी महाविहार व्यवस्थापन व सरंक्षण कायदा या शिर्षका अंतर्गत केंद्रीय कायदा करुन, महाबोधी महाविहाराची मालकी, व्यवस्थापन, संरक्षण, नियंत्रण व प्रशासन भारतातील बुद्ध विहार, उपासक संघ, आणि भिक्खू संघ यांच्या राष्ट्रीय स्तरावर स्थापन होणाऱ्या प्रतिनिधींचे केंद्रीय मंडळ यांच्या ताब्यात देणे' हा पुस्तकाचा विषय असल्याचे स्पष्ट केले. तसेच केंद्रीय कायदयाच्या मागणीचे स्पष्टीकरण करणे आणि भारत सरकार, राष्ट्रपती व प्रधानमंत्री यांना सादर केलेला केंद्रीय कायदयाचा मसुदा पुस्तकरुपाने भारतीय बौद्ध समुदायालाही सादर करणे. हा पुस्तक प्रकाशनाचा उद्देश असल्याचे स्पष्ट केले.

अ‍ॅड. दिलीप काकडे यांनी विषयाची वैशिष्टयेपूर्ण मांडणी केली केली. त्यात ते म्हणाले की, (१) बोधगया मंदिर कायदा, १९४९ रद्द केल्यानंतर त्याला पर्यायी कायदा कोणता व त्याचे स्वरुप कसे असेल तसेच महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात दयावे म्हणजे नेमके कोणाच्या ताब्यात द्यावे? या जनभावनेचे स्पष्टीकरण करणारे हे पहिले व एकमेव पुस्तक आहे. (२) महाविहाराच्या निर्मितीपासून उत्खननापर्यंतच्या सर्व ऐतिहासिक घटनांचा संक्षीप्त आढावा केंद्रीय कायदा करण्याच्या दृष्टीने कसा महत्वाचा आहे. याचे स्पष्टीकरण करणारे हे पुस्तक आहे. (३) १८८६ ते २०२६, या १४० वर्षाच्या आंदोलनाचे स्वरुप राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय आहे. (४) १९४९च्या राज्यस्तरीय कायद्याचे उद्देश आणि कारणे, १८ कलमे व ५५ उपनियम बौद्धांच्या दृष्टीने कसे आक्षेपार्ह आहेत. (५) आंतरराष्ट्रीय मानवी अधिकाराचे उल्लंघन, अनुच्छेद १३, १४, २५, २६, २९ या मुलभूत संविधानिक अधिकाराचे उल्लंघन, अनुच्छेद २६ ब वर आधारित सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे उल्लंघन हा राज्यस्तरीय कायदा करतो. (६) १९९२ आणि १९९३ साली महाविहार संबंधी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका मागे घेतल्या तर केंद्रीय कायदा करण्याची अडचण येणार नाही. असे केंद्र सरकाराने आश्वासन दिल्यानंतर याचिका मागे घेतल्या परंतु सरकारने आश्वासन पूर्ण केले नाही. तसेच १९९६ ते २०२६ या काळात लोकसभा व राज्यसभेमध्ये अनेक संसद सदस्यांनी महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यासाठी संसदेने कायदा करण्याची मागणी केली आहे. याची माहिती या पुस्तकात दिलेली आहे. (७) महाबोधी महाविहार हे प्राचीन स्मारक व पुरातत्वीय स्थळ असुन त्याला युनेस्कोने जागतिक वारसास्थळ म्हणून मान्यता दिली आहे परंतु भारतामध्ये त्याला प्राचीन स्मारक व पुरातत्वीय स्थळाची मान्यता दिलेली नाही. ती देऊन त्याच आधारावर केंद्रीय कायदा मागणारे हे पहिले व एकमेव पुस्तक आहे. महाबोधी महाविहाराचा कायदा राज्यस्तरीय नको तर तो राष्ट्रीयच असला पाहिजे अशी आग्रह भूमिका मांडणारे हे पुस्तक आहे. ज्या धर्माचे स्मारक त्याच धर्माची समिती अशी आग्रही भूमिका मांडणारे हे पुस्तक आहे. (९) राम मंदिर ट्रस्ट प्रमाणे महाबोधी महाविहारासाठी केंद्रीय कायदा भारत सरकारद्वारा संसदेने पारित करावा. (१०) महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्याबाबतची बिहार राज्याची भूमिका कायमच नकारात्मक राहीली आहे तर केंद्र सरकारची भूमिका या विषयाकडे दुर्लक्ष करण्याची आहे. (११) पुस्तकाच्या दुसऱ्या खंडात कायदेशीर तरतूदींचा मसूदा दिला आहे (१३) महाबोधी महाविहार या जागतिक वारसा स्थळासाठी केंद्रीय कायदा असणे आवश्यक असतानाही राज्यस्तरीय कायदा करणे कसे अयोग्य व अन्यायकारक आहे.

विधी संचलन सुनिल वाघपंजे, सुत्रसंचालन अ‍ॅड. कुशल जंगलबाग, व्यवस्थापन अ‍ॅड. मिलन जंगलबाग यांनी केले.

# 'एल-निनो'च्या पार्श्वभूमीवर पाण्याचे काटेकोर नियोजन करा

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे निर्देश; अनधिकृत पाणी उपसा केल्यास वीजपुरवठा खंडित करा; पाणीसाठा आरक्षण व कृषी नियोजनाबाबत आढावा बैठक

नगर - 'एल-निनो'च्या संभाव्य प्रभावामुळे निर्माण होणारी परिस्थिती लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करावे. शासनाच्या २०१८ च्या निर्णयानुसार पिण्याच्या पाण्याचे आरक्षण प्राधान्याने राखून कालवे व बॅकवॉटर क्षेत्रातील अनधिकृत पाणी उपसा तात्काळ थांबवावा. आवश्यकतेनुसार अशा ठिकाणांवरील वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात 'एल-निनो'चा संभाव्य प्रभाव, पाणीसाठा आरक्षण व कृषी विभागाच्या उपाययोजनांबाबत आयोजित तातडीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, नगरपालिका प्रशासन अधिकारी डॉ.प्रदीप पठारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.विरेंद्र बडदे, नायब तहसीलदार भारती घोरपडे तसेच कृषी, जलसंपदा, महापालिका व महसूल विभागांचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, पिण्याच्या पाण्याची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन शेतीसाठी देण्यात येणारे पाणी आवर्तन तात्काळ बंद करण्यात यावे. जलसंपदा विभागाने पाणीचोरी रोखण्यासाठी तात्काळ भरारी पथके नियुक्त करावीत. कालवे व बॅकवॉटर क्षेत्रात सुरू असलेला अनधिकृत पाणी उपसा त्वरित बंद करावा. आवश्यकतेनुसार संबंधित विद्युत वितरण केंद्रे बंद करून वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

महापालिका, नगरपालिकांनी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी ग्रामीण भागात उपलब्ध पाणीसाठ्यानुसार पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे. स्थानिक परिस्थितीनुसार नागरिकांना दैनंदिन किंवा दिवसाआड पाणीपुरवठा करण्याबाबत निर्णय घ्यावा. तसेच जलसंपदा विभागाच्या मुख्य व कार्यकारी अभियंत्यांनी विद्यमान पाणीसाठ्याची स्थिती तपासून पाण्याच्या सुयोग्य वापरासाठी सविस्तर नियोजन आराखडा तातडीने सादर करावा, असे त्यांनी सांगितले.

कालव्यांद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करताना मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्यास अशा ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे अधिक किफायतशीर व पाणी बचतीचे ठरत असेल, तर त्या पर्यायाची तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर तपासणी करावी, असे निर्देशही श्री.आशिया यांनी बैठकीत दिले.

कृषी विभागाने शेतकऱ्यांना पेरणीबाबत योग्य मार्गदर्शन करावे. जमिनीत पुरेशी ओल निर्माण झाल्याशिवाय व समाधानकारक पाऊस पडल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आवाहन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावे. उतारावर आडवी पेरणी करण्याबाबत जनजागृती करावी. जिल्ह्यात खते व बियाण्यांची पुरेशी उपलब्धता आहे. मात्र खतांचा काळाबाजार, लिंकिंग तर होत नाही ना याची कृषी विभागाने भरारी पथकांच्या माध्यमातून तपासणी करावी. खत व बियाणे पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी आणि 'डिजिटल पीक पाहणी' मोहीम तातडीने पूर्ण करावी, अशा सूचना त्यांनी कृषी विभागाला दिल्या.

जिल्ह्यात सुरू असलेली जलसंधारणाची कामे, गाळ काढण्याची कामे व इतर पाणी साठवण क्षमतेत वाढ करणारी कामे जलद गतीने पूर्ण करावीत, जेणेकरून उपलब्ध पावसाच्या पाण्याचा जास्तीत जास्त साठा निर्माण करता येईल, असेही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी सांगितले.

# पाणी थंड करण्यासाठी नगरमध्ये फॉर्मलीन केमिकलचा सर्रास वापर

### ॲड.संजय जव्हेरी यांची आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडे तक्रार; कारवाईची मागणी



नगर - शहरामध्ये थंड पाण्याचे जार विक्री करणारे विक्रेते हे पाणी थंड करण्याकरिता फॉर्मलीन या केमिकलचा सर्रास वापर करत आहेत. या पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहेत. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिने होणारी ही हेळसांड त्वरित थांबावी व नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या समधीत पाणी जार विक्रेत्यांवर कारवाई करावी अशी मागणी ॲड. संजय जव्हेरी यांनी राज्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकारात मुंढे यांच्याकडे ईमेलव्दारे निवेदन पाठवून तक्रार केली आहे.

अहिल्यानगर शहरातील सार्वजनिक ठिकाणी, हॉटेल्स तसेच शहरातील विविध ठिकाणच्या खाद्य पदार्थांच्या गाड्या तसेच शाळा परिसरातील खाद्य विक्री ठिकाणी इत्यांदीमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी या जारचा उपयोग केला जातो. शाळेत जाणारी मुले तसेच अडाणी जनता ही थंड पाणी म्हणून हे जारचे पाणी पित असतात. पाणी थंड करण्यासाठी मात्र फॉर्मलीन या विषारी केमिकलचा वापर केला जातो. याबाबत जनतेत जनजागृती नसल्याने नागरिकांच्या आरोग्याशी खेळले जातात आहे.

ही बाब धोकादायक असून, आयुक्त मुंढे यांनी स्वतः आरोग्याशी खेळणाऱ्या या भयंकर विषारी समसयेकडे लक्ष द्यावे अशी मागणी ॲड. संजय जव्हेरी यांनी केली आहे.

# राज्यातील वाढती लाचखोरी रोखण्यासाठी 'पावसाळी अधिवेशनामध्ये' आवाज उठवावा

### अहिल्यानगरमधून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर - राज्यात दिवसेंदिवस लाचखोरी वाढत आहे. राज्यातील वाढत्या भ्रष्टाचारामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त झालेली आहे. जनतेच्या रीतसर कामांसाठी लोकसेवकांकडून कोट्यवधी रुपयांच्या लाचेची मागणी केली जात आहे. दोन दोन वेळा लाचखोरीचे गुन्हे दाखल झाल्यानंतरही तो लोकसेवक पुन्हा सेवेत कार्यरत होतो. यामुळे प्रामाणिकपणे कर्तव्य बजावणाऱ्या लोकसेवकाचे मनोधैर्य खचून तोही लाचखोरीकडे वळत आहे. याबाबत राज्य शासनाकडे ऑगस्ट २०२४ पासून सातत्याने पाठपुरावा करूनही शासन त्याकडे गांभीर्याने पाहत नाही. म्हणून येत्या पावसाळी अधिवेशनामध्ये काँग्रेस विधानसभा सदस्यांच्या माध्यमातून वाढती लाचखोरी रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणेबाबत विधानसभेत आवाज उठवावा अशी मागणी अभय ललवाणी यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात श्री. ललवाणी यांनी म्हटले आहे की, राज्यातील वाढती लाचखोरी रोखण्यासाठी १३ ऑगस्ट २०२४ रोजी राज्याच्या मुख्य सचिवांना सविस्तर पत्र देण्यात आले होते. त्यामध्ये वाढतील लाचखोरी रोखण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियम १९७९ मध्ये आवश्यक ते सर्व बदल करण्याचे देखील सुचविण्यात आले होते. मात्र मुख्य सचिवांनी आजतागायत कोणतीही ठोस कार्यवाही केली नाही.

वाढत्या लाचखोरीबाबत राज्याच्या लोक आयुक्त तथा उप लोक आयुक्त यांचेकडे जुलै २०२५ मध्ये तक्रार दाखल केली होती. परंतु ही बाब शासनाच्या ध्येयधोरणाशी निगडित असल्याने व अधिकार क्षेत्र अभावी हस्तक्षेप करता येत नसल्याने मुख्यमंत्री, राज्यपाल किंवा सक्षम न्यायालयाकडे दाद मागावी असे लोक आयुक्तांनी ऑक्टोबर २०२५ मध्ये पत्रांन्वये कळविले होते. अशाप्रकारे लाचखोरी रोखण्यासाठी दीड वर्षांपेक्षा अधिक काळापासून शासनाकडे सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा करून देखील राज्य शासन वाढती लाचखोरी रोखण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाने येत्या पावसाळी अधिवेशनामध्ये काँग्रेस पक्षाच्या विधानसभा सदस्यांच्या माध्यमातून विधानसभेत वाढत्या लाचखोरीचा मुद्दा प्रभावीपणे मांडावा व जनतेला लाचखोरीपासून दिलासा द्यावा अशी मागणी श्री. ललवाणी यांनी निवेदनात केली आहे.

# आडसूळचे प्रा. रमेश गडाख यांना मेकॅनिकल इंजिनिअरिंगमधील पी.एच.डी. प्रदान



नगर - चास अहिल्यानगर, आडसूळ संकुलनामध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये संशोधन वृत्ती विकसित होण्याच्या हेतूने वेळोवेळी विविध उपक्रम आयोजित करण्यात येतात त्यामुळे आज संकुलनामध्ये शंभराहून अधिक पीएचडी प्राध्यापक उपलब्ध आहेत.
त्यातच नव्याने आडसूळ कॉलेजचे प्रा. रमेश सूर्यभान गडाख यांना यंत्र अभियांत्रिकी शाखेची मॉडलिंग अँड ऑप्टिमायझेशन ऑफ व्हेईकल सस्पेन्शन सिस्टीम फॉर व्होल बॉडी व्हायब्रेशन या विषयावरील संशोधन व शोधनिबंधासाठी राजस्थान येथिल जे. जे. टी. यू. विद्यापीठाने नुकतीच पी. एच. डी. प्रदान केली आहे.

प्रा. रमेश गडाख यांच्या संशोधनामुळे ऑटोमोबाईल्स निर्मिती तंत्रज्ञानाला एक नवी दिशा मिळाली आहे. वाहनामध्ये निर्माण होणारे कंपने आणि मानवी शरीर रचनेवर (ऑर्गनामी) होणारा दुष्परिणाम त्याचा अभ्यास करून वाहनांची कंपने अत्यल्प करून कंपनाचे मानवी शरीरावर होणारे दुष्परिणाम टाळण्याचा प्रमुख उद्देश या संशोधनाचा आहे. हे संशोधन, ऑटोमोबाइल उद्योगासाठी प्रायोगिक आणि संगणकीय निष्कर्षासाठी मार्गदर्शक ठरतील, विशेषतः हलक्या व्यवसायिक वाहनांपासून ते प्रवासी वाहनांपर्यंत सस्पेन्शन अनुकूलनासाठी. या संशोधनातून विकसित केलेले ऑप्टिमायझेशन अल्गोरिदम आणि कंट्रोल स्ट्रॅटेजी उत्पादनच्या दिशेने प्रोटोटाइपिंग साठीच्या सहकार्यांसाठी उपयुक्त ठरतील. शैक्षणिकदृष्ट्या, या कामाने आडसूळ शैक्षणिक संकुला मध्ये संशोधन संस्कृतीला खऱ्या अर्थाने बळ दिले. विद्यार्थी प्रकल्प, इंडस्ट्री-इंटर्नशिप व पुढील पी.एच.डी. संशोधनासाठी नवीन दिशा खुली झाली आहे.

या महत्वपूर्ण संशोधनासाठी मार्गदर्शक म्हणून डॉ. नितीशकुमार गौतम व डॉ. महेश पुरुषोत्तम नगरकर यांचे मार्गदर्शन मिळाले. आडसूळ शैक्षणिक संकुलात झालेल्या सत्कार समारंभात बोलताना साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध आडसूळ यांनी सांगितले की प्रा. रमेश गडाख हे अत्यंत कर्तव्यदक्ष असून अल्पावधीतच त्यांनी आडसूळ कॉलेजचे नावलौकिक आपल्या शिस्तबद्ध व नियोजनबद्ध कार्यपद्धतीतून नगर जिल्हा व पंचक्रोशीत पसरवला आहे. आज आडसूळ पॉलीटेक्निक दर्जेदार शैक्षणिक गुणवत्तेसाठी अग्रेसर ठरलेले आहेच परंतु त्याचबरोबर क्रीडा क्षेत्रात, स्पर्धा परीक्षांमध्ये, संशोधन क्षेत्रामध्ये, विद्यार्थ्यांना रोजगार निर्मिती व उद्योजकता विकास याबाबतही अग्रेसर ठरत आहे. आणि याच कारणामुळे दरवर्षी आडसूळ कॉलेज कडे प्रवेशा करता विद्यार्थी व पालक यांचा प्राधान्यक्रम दिसून येतो याचे सर्व श्रेय प्रा. रमेश गडाख व त्यांचे सर्व सहकारी यांचेच आहे.

प्राचार्य व संचालक डॉ. प्रदीप एम पाटील यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की अत्यंत व्यस्त दिनक्रम असतानाही प्रा. रमेश गडाख यांनी संशोधन क्षेत्रातही योगदान देत पी. एच. डी. मिळवली त्याबद्दल त्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध आडसूळ, संस्थेच्या सचिव सौ. लीना आडसूळ, डायरेक्टर कृष्णा आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ, सदस्य डॉ. कल्पना आडसूळ, सौ. रत्न आडसूळ, सौ. पायल आडसूळ, आडसूळ टेक्निकल कॅम्पसचे प्राचार्य व डायरेक्टर डॉ. प्रदीप एम पाटील, डॉ. संभाजी पठारे, डॉ. प्रदीम पंडित, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. लांडगे धनंजय व डॉ. संदेश वायाळ, लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. रियाज बेग, डीएड कॉलेजचे प्राचार्य प्रा. घनश्याम गिरवले आणि विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांनी प्राचार्य प्रा. रमेश सूर्यभान गडाख यांचे अभिनंदन केले.

# रोपांच्या भेटीतून विद्यार्थ्यांची शैक्षणिक सुरुवात; आदर्श शाळेत पर्यावरणपूरक पद्धतीने स्वागत

### 'एक विद्यार्थी-एक झाड'चा पर्यावरणपूरक संदेश; प्रत्येक विद्यार्थ्याने एक झाड लावून त्याचे संवर्धन करावे : लतिका पवार



नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभाचे औचित्य साधत पुण्यश्लोक आहिल्यादेवी सेवा संघ संचलित तपोवन रोड परिसरातील आदर्श प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचे पर्यावरणपूरक पद्धतीने स्वागत करण्यात आले.

नगर - नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभाचे औचित्य साधत पुण्यश्लोक आहिल्यादेवी सेवा संघ संचलित तपोवन रोड परिसरातील आदर्श प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचे पर्यावरणपूरक पद्धतीने स्वागत करण्यात आले. शिक्षणासोबतच पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्याच्या उद्देशाने प्रत्येक विद्यार्थ्याला रोप भेट देण्यात आले. औक्षण, गुलाबपुष्प, मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण आणि खाऊ वाटप अशा विविध उपक्रमांमुळे शाळेच्या पहिल्याच दिवशी आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरण शाळेच्या प्रांगणात निर्माण झाले होते.

नवीन शैक्षणिक वर्षासाठी शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून स्वागत करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याला गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. यानंतर विद्यार्थ्यांना विविध प्रकारची रोपे भेट देण्यात आली. या रोपांची घरी लागवड करून त्यांचे संगोपन आणि संवर्धन करण्याचे आवाहन शाळेच्या वतीने करण्यात आले. पर्यावरणाचे रक्षण ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असून बालपणापासूनच विद्यार्थ्यांमध्ये वृक्षसंवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून लिनेस क्लब व सामाजिक प्रदूषण निवारण मंडळाच्या जिल्हाध्यक्षा लतिका पवार, इंजि. शांभवी कदम, मुख्याध्यापक अशोक शिंदे, सहशिक्षक नजन रभाजी, उषा गावडे, मंगल कासार, किरण टापरे, अंजली कटके, योगेश बेल्हेकर यांच्यासह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

लतिका पवार म्हणाल्या की, प्रत्येक दिवस हा काहीतरी नवीन शिकण्याचा, स्वतःला घडवण्याचा आणि आपल्या ध्येयाकडे वाटचाल करण्याचा दिवस असतो. विद्यार्थ्यांनी जिज्ञासा, मेहनत आणि सकारात्मक विचार यांच्या जोरावर सातत्याने प्रगती करत राहिले पाहिजे. आजचे विद्यार्थी हेच उद्याच्या भारताचे भविष्य आहेत. त्यांनी घेतलेले शिक्षण, मिळालेले संस्कार आणि अंगीकारलेली मूल्ये यांच्यावरच सशक्त समाजाची उभारणी अवलंबून आहे. त्या पुढे म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करून शिक्षकांचा आदर करावा, पालकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत आणि जबाबदार नागरिक बनण्यासाठी स्वतःला तयार करावे. नवीन शैक्षणिक वर्षात प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक झाड लावण्याचा, पर्यावरणाचे रक्षण करण्याचा, स्वच्छता राखण्याचा आणि समाजासाठी सकारात्मक योगदान देण्याचा संकल्प करावा. शिक्षणासोबतच चांगले संस्कार आणि सामाजिक जाणीव जोपासणे ही आजच्या काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. शिक्षणाच्या नव्या प्रवासाला सुरुवात करताना पुस्तकांसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारे रोपही मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांना लतिका पवार यांच्या वतीने रोपांसह खाऊची भेट देण्यात आली. रोपांच्या भेटीतून पर्यावरणप्रेम, पाठ्यपुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानाची वाटचाल आणि प्रेरणादायी मार्गदर्शनातून मूल्यशिक्षणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे पालकांनीही कौतुक केले.

# रोजगार आणि असंघटित क्षेत्रावरील माहिती संकलनासाठी २ महत्त्वाच्या सर्वेक्षणांचा शुभारंभ



केंद्र शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या नियतकालिक कामगार शक्ती सर्वेक्षण आणि असंघटित क्षेत्र उपक्रमांचे वार्षिक सर्वेक्षण या दोन महत्त्वाच्या सर्वेक्षणांचा शुभारंभ सहआयुक्त नगर पालिका प्रशासन, डॉ. प्रदीप पठारे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आला.

नगर - राज्यातील रोजगार, बेरोजगारी तसेच असंघटित क्षेत्रातील उद्योग-व्यवसायांबाबत अचूक माहिती संकलित करण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या नियतकालिक कामगार शक्ती सर्वेक्षण आणि असंघटित क्षेत्र उपक्रमांचे वार्षिक सर्वेक्षण या दोन महत्त्वाच्या सर्वेक्षणांचा शुभारंभ सहआयुक्त, नगर पालिका प्रशासन, डॉ. प्रदीप पठारे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आला.

यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी तथा उपआयुक्त, सांख्यिकी कार्यालयाचे दीपक दातीर, सांख्यिकी सहाय्यक रवि केशव निकाळजे तसेच अन्वेषक प्रशांत आसने, रामचंद्र कदम आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. प्रदीप पठारे म्हणाले की, रोजगार व असंघटित क्षेत्राबाबतची अचूक माहिती उपलब्ध झाल्यास शासनाला विविध योजनांचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येते. बेरोजगारी, स्वयंरोजगार, उद्योगांची स्थिती तसेच नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी हे सर्वेक्षण अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयामार्फत देशभर हे सर्वेक्षण राबविण्यात येत असून, त्यातून रोजगार व असंघटित क्षेत्राचा सखोल अभ्यास होऊन शासनाला धोरणात्मक निर्णय घेण्यास मदत होणार आहे. या सर्वेक्षणाद्वारे नागरिकांची आर्थिक स्थिती, रोजगाराचे स्वरूप, उद्योग-व्यवसाय, वेतन, कामगारांची संख्या तसेच स्थानिक पातळीवरील रोजगाराच्या संधींबाबत माहिती संकलित करण्यात येणार आहे.

नियतकालिक कामगार शक्ती सर्वेक्षण आणि असंघटित क्षेत्र उपक्रमांचे वार्षिक सर्वेक्षण यांच्या माध्यमातून असंघटित क्षेत्रातील उद्योगांची सद्यस्थिती, महिलांचा रोजगारातील सहभाग, स्वयंरोजगार तसेच व्यवसायक्षेत्रातील बदल यांचाही अभ्यास करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणांतून प्राप्त होणारी अचूक माहिती शासनाला रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास, उद्योजकता प्रोत्साहन आणि विविध कल्याणकारी योजनांचे नियोजन अधिक परिणामकारकपणे करण्यास उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या सर्वेक्षणासाठी नियुक्त अधिकाऱ्यांनी नागरिकांशी समन्वय साधून अचूक माहिती संकलित करावी तसेच नागरिकांनीही योग्य माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# एकादशी संगीत सभेच्या पुष्प-२० मध्ये डॉ. कीर्ती गंधे यांचे गायन



नगर - संपूर्ण स्वरानंद बहुउद्देशीय संस्था व किसनगिरी बाबा भक्त मंडळ, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'एकादशी संगीत सभा - पुष्प २०' या कार्यक्रमास रसिकांचा प्रतिसाद लाभला. गुरुदत्त भक्तिधाम, संत किसनगिरीनगर, भिस्तबाग, अहिल्यानगर येथे ११ जून रोजी रात्री ८ वाजता झालेल्या या कार्यक्रमात आर.एन.भनगडे सर व डॉ. सौ.धनश्री खरवंडीकर यांच्या शिष्या गायिका डॉ. सौ.कीर्ती गंधे यांनी अभिजात आणि भक्तिरसपूर्ण गायनाने उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. गुरुदत्तांच्या स्तुतीने कार्यक्रमाची सुरुवात करून त्यानंतर विविध भावपूर्ण भक्तिगीतांच्या सादरीकरणातून डॉ. गंधे यांनी आपल्या सुरेल आवाजाची मोहिनी रसिकांवर घातली. त्यांच्या प्रत्येक सादरीकरणाला श्रोत्यांकडून दाद मिळाली.

या कार्यक्रमात हार्मोनियमवर सुधाकर शिंदे, तबल्यावर संदेश बेलदार, तर टाळ साथीवर अभिषेक ससाणे व वेदांत कुलकर्णी यांनी साथसंगत केली. सर्व कलाकारांमधील उत्तम समन्वयामुळे संपूर्ण कार्यक्रमाची रंगत अधिक खुलली. स्वरानंद बहुउद्देशीय संस्था व किसनगिरी बाबा भक्त मंडळ यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या संगीत सभेमुळे शास्त्रीय संगीत आणि भक्तीपर परंपरेचा सुंदर संगम अनुभवण्याची संधी रसिकांना मिळाली.

प्रा. सतीश आचार्य व सुधाकर शिंदे यांनी अशा सांगीतिक उपक्रमांमुळे सांस्कृतिक परंपरेचे जतन व संवर्धन होत असून महेश खोपटीकर यांनी छान संकल्पना मांडली आहे व त्या निमित्ताने नवोदित तसेच दिग्गज कलाकारांना स्टेज मिळत आहे याच बरोबर संगीत सभेच्या माध्यमातून कलेचा प्रसार व प्रचार होत आहे अशी भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचा शेवट सर्व कलाकारांच्या सत्काराने व उपस्थितांचे आभार मानून करण्यात आला.

# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन केला 'प्रवेश महोत्सव'; अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभागाचा उपक्रम

### शारदा विद्या मंदिरमध्ये नवे प्रवेश



केंद्र स्तर शिक्षकांनी व मार्कंडेय माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिक्षक यांनी थेट विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत पोहोचून प्रवेश महोत्सव साजरा केला, तसेच शाळेत नवीन प्रवेश देखील निश्चित केले.

नगर - दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये आणि त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, यासाठी अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या रिमांड होम केंद्रांतर्गत एका विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेद्वारे केंद्र स्तर शिक्षकांनी व मार्कंडेय माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिक्षक यांनी थेट विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत पोहोचून प्रवेश महोत्सव साजरा केला, तसेच शाळेत नवीन प्रवेश देखील निश्चित केले.

रिमांड होम केंद्रातील केंद्र स्तर विशेष शिक्षक उमेश शिंदे, रामेश्वर ढगे, मार्कंडेय माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक संदीप छिंदम, निलेश आनंदास यांनी एका दिव्यांग विद्यार्थ्याच्या घरी जाऊन त्याचे पुष्पगुच्छ देऊन उत्साहात स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्याची भेट देण्यात आली.

केंद्र स्तर विशेष शिक्षक उमेश शिंदे यांनी या मुलाशी आपुलकीने संवाद साधला. तसेच पालकांशी चर्चा करताना त्यांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्यांचे योग्य समुपदेशन केले व शासनाकडून मिळणाऱ्या विविध सोयी-सुविधांची सविस्तर माहिती दिली. मुख्याध्यापक संदीप छिंदम यांनी पालकांना आपल्या पाल्याला नियमित शाळेत पाठवण्यासाठी विशेष प्रोत्साहन दिले.

रिमांड होम केंद्रातील दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत, यासाठी विशेष शिक्षक उमेश शिंदे आणि रामेश्वर ढगे यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांतून काही दिव्यांग विद्यार्थ्यांचे 'शारदा विद्या मंदिर' मध्ये यशस्वीरित्या प्रवेश करण्यात आले. शाळेत प्रवेशावेळी मुख्याध्यापिका भक्ती पुराणिक यांनी या सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून स्वागत केले. तसेच विद्यार्थ्यांचा पुढील अभ्यासक्रम सुकर व्हावा याकरिता त्यांना शाळेच्या वतीने पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.




**ही कथा आहे विकास नहार यांची. कर्नाटकातील एका साध्या शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या या तरुणाला यश मिळण्यापूर्वी वीसपेक्षा अधिक अपयशांचा सामना करावा लागला. अनेकदा परिस्थिती इतकी कठीण होती, की उदरनिर्वाहासाठी त्यांना छोटी-मोठी कामे करावी लागली; मात्र त्यांनी स्वत:वरचा विश्वास आणि स्वप्नांवरील श्रद्धा कधीही सोडली नाही.**

# एका निर्णयाने बदलले आयुष्य

अचिव्हर



१९८४ मध्ये जन्मलेल्या विकास यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कॉफी आणि काळी मिरीच्या शेतीवर अवलंबून होता. शेतीमुळे त्यांना लहानपणापासूनच संयम, मेहनत आणि संघर्षाचे धडे मिळाले. त्यांचे वडील शेतीबरोबरच कॉफी आणि काळी मिरीचा व्यापारही करत होते. त्यामुळे व्यवसायाची प्राथमिक समज त्यांना लहान वयातच मिळाली. गावातील शाळेतून शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी बेंगळुरू विद्यापीठातून २००५ मध्ये संगणकशास्त्राची पदवी घेतली. त्यानंतर एका मोठ्या कंपनीत आशियाई विभागासाठी वरिष्ठ आयात व्यवस्थापक म्हणून तीन वर्षे काम केले. चांगली नोकरी असूनही त्यांना स्वतःची ओळख निर्माण करायची होती. त्यामुळे त्यांनी नोकरीचा राजीनामा देऊन 'सिम्बॉयसिस' मधून एमबीए करण्याचा निर्णय घेतला. याच काळात त्यांच्या उद्योजकीय प्रवासाची खरी सुरुवात झाली.

एमबीएदरम्यान कॅम्पस प्लेसमेंटमधून त्यांची एका नामांकित बँकेत निवड झाली; मात्र अवघ्या सहा महिन्यांत त्यांनी ती नोकरी सोडली. त्यानंतर आरोग्यविषयक उत्पादने आणि सुकामेवा क्षेत्रातील एका स्टार्टअपमध्ये साडेचार वर्षे व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम केले. याच काळात मिळालेला अनुभव पुढे स्वतःचा व्यवसाय उभा करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरला. व्यवसायाची पार्श्वभूमी असूनही स्वतःची कंपनी सुरू करणे सोपे नव्हते. गुंतवणूकदारांकडे कल्पना घेऊन गेले, की वारंवार नकार मिळत असे. या संघर्षाच्या काळात त्यांनी किरकोळ विक्रेता आणि वितरक म्हणूनही काम केले.

दहा हजार रुपयांमध्ये व्यवसाय

गुंतवणूकदारांकडून मदत न मिळाल्याने स्वतःच्या बचतीतील केवळ १० हजार रुपये आणि दोन कर्मचारी यांच्या मदतीने त्यांनी 'हॅपिलो' ची स्थापना केली. पुढे त्यांच्या पत्नीने २० लाख रुपयांचे कर्ज घेऊन व्यवसायात गुंतवणूक केली. त्यानंतर सरकारच्या एका योजनेंतर्गत ७५ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळाली. त्यामुळे व्यवसायाला गती मिळाली.

कोरोनाकाळातील मोठे आव्हान

व्यवसाय हळूहळू वाढत असतानाच कोविड-१९ महामारी आली. कंपनीचा मोठ्या प्रमाणा-तील माल गोदामात अडकून पडला. आवश्यक पुरवठ्याची परवानगी मागण्यासाठी विकास प्रशासनाकडे गेले असता, ड्रायफ्रूट्स अत्यावश्यक वस्तूंमध्ये मोडत नसल्याचे सांगण्यात आले. कर्मचाऱ्यांचे पगार कसे द्यायचे हा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला; मात्र त्यांनी हार न मानता व्यवसायाची दिशा बदलली. त्यांनी ई-कॉमर्सचा स्वीकार केला आणि उत्पादने ऑनलाइन विकण्यास सुरुवात केली. हाच निर्णय त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा टर्निंग पॉइंट ठरला.


आज ५०० कोटींहून अधिक उलाढाल

आज 'हॅपिलो' हा केवळ सुकामेव्याचा ब्रँड नाही, तर भारतीय उद्योजकतेचे यशस्वी उदाहरण बनला आहे. कंपनीकडे आज ४० पेक्षा अधिक प्रकारचे पॅकेज्ड ड्रायफ्रूट्स, १०० हून अधिक चॉकलेट प्रकार, ६० पेक्षा अधिक मसाल्यांच्या श्रेणी उपलब्ध आहेत. सत-तची मेहनत, योग्य नियोजन आणि बदल स्वीकारण्याची तयारी यामुळे कंपनीची वार्षिक उलाढाल ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक झाली आहे.

# इन्स्टाग्रामवर 'स्टोरी एडिट'करण्याचा पर्याय

स्मार्ट टिप्स

इन्स्टाग्राम वापरकर्त्यांसाठी एक मोठी सुविधा आली आहे. आता स्टोरी पोस्ट केल्यानंतर चूक झाल्यास डिलीट करण्याची गरज नाही. कंपनीने आयफोन यूजर्ससाठी 'स्टोरी एडिट' करण्याचा पर्याय सुरू केला आहे. यामुळे लाखो यूजर्सना मोठा फायदा होणार आहे. पूर्वी स्टोरीमध्ये टायपिंग एरर, चुकीचे स्टिकर किंवा कॅप्शन चुकल्यास संपूर्ण स्टोरी डिलीट करावी लागायची. नंतर ती पुन्हा बनवून पोस्ट करावी लागायची. यामुळे वेळ आणि मेहनत दोन्ही वाया जायचे; पण आता ही समस्या संपली आहे.



**स्टोरी एडिट कशी कराल?**

स्टोरीवर टॅप केल्यावर एक मेन्यू उघडेल. त्यात 'एडिट' हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक केल्यानंतर एक चेतावणी येईल. एडिटिंग सुरू केल्यावर मूळ स्टोरी डिलीट केली जाईल आणि सर्व लाईक्स, रिॲक्शन्स आणि कॉमेंट्स रीसेट होतील. सध्या टेक्स्ट, स्टिकर्स, इमोजी, लिंक्स आणि टॅग्ज एडिट करता येतील की नाही, याबाबत पूर्ण माहिती अद्याप समोर आलेली नाही.

फक्त आयफोन यूजर्ससाठी सुरुवात

सध्या हे फीचर मर्यादित आयफोन वापरकर्त्यांना उपलब्ध झाले आहे. अँड्रॉइड यूजर्सना थोडा वेळ थांबावे लागू शकते. इन्स्टाग्रामने याबाबत अधिकृत घोषणा अद्याप केलेली नाही; पण लवकरच सर्वांसाठी उपलब्ध होईल, अशी आशा आहे.

इन्स्टाग्राममध्ये एकापाठोपाठ अपडेट्स

गेल्या काही दिवसांमध्ये इन्स्टाग्राम वेगाने बदल घडवत आहे. नुकतेच १५ मिनिटांच्या आत कमेंट एडिट करण्याची सुविधा दिली. त्यानंतर जवळच्या मित्रांसाठी 'डिसअॅपिरींग फोटो' हे फीचरही आणले; मात्र एक बदल अनेकांना आवडलेला नाही.

# टॉवर आणि सिमशिवायही चालणार मोबाईल

टेक्नॉलॉजी

कल्पना करा, तुम्ही डोंगरात, जंगलात किंवा पूरग्रस्त भागात आहात. मोबाईल टॉवर नाही, सिम नाही, तरीही फोन सुरू आहे. कॉल येतो आणि इंटरनेटही चालू आहे. हे शक्य होणार आहे 'डायरेक्टटू डिव्हाईस' (डी २ डी) तंत्रज्ञानाने. भारत सरकार दुर्गम भागांमध्ये कनेक्टिव्हिटी पोहोचवण्यासाठी या तंत्रज्ञानावर गांभीर्याने विचार करत आहे.




डी २ डी तंत्रज्ञान म्हणजे काय?

डी २ डी हे उपग्रह-आधारित तंत्रज्ञान आहे. यामुळे सामान्य स्मार्ट फोन थेट आकाशातील उपग्रहांशी जोडला जातो. टॉवर किंवा पारंपरिक नेटवर्कची गरज पडत नाही. जिथे ४ जी-५ जीसुद्धा पोहोचत नाही तिथेही संवाद साधणे शक्य होईल. आपत्ती, डोंगराळ किंवा दूरदूरच्या गावांसाठी हे जीवनदायी ठरू शकते.

भारतसरकारची मोठी योजना

देशाच्या कानाकोपऱ्यातील लोकांना मजबूत कनेक्टिव्हिटी देण्यासाठी सरकार डी २ डी तंत्रज्ञान आणण्याच्या तयारीत आहे. दूरसंचार विभाग (डीओटी) आणि 'ट्राय'यावर काम करत आहेत. स्पेक्ट्रम बँड्स निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामुळे मोबाईल टॉवर्स नसलेल्या भागांतही लोक जोडले जातील.

ॲपलची चिंता आणि सल्ला

'ॲपल'ने भारताला सावध केले आहे. कंपनी म्हणते, की आयफोनमध्ये मोठे हार्डवेअर बदल नकोत. या नेटवर्कची सुरक्षा आधी मजबूत करावी. उपग्रह तंत्रज्ञान पूर्ण विकसित होईपर्यंत घाई नको, असे 'ॲपल'चे मत आहे. नियामक आणि समन्वयाच्या समस्यादेखील कंपनीने उपस्थित केल्या आहेत.

'गूगल' ने चार प्रमुख समस्या सांगितल्या

'गूगल' ने 'ॲपल' शी सहमती दर्शवत अनेक तांत्रिक आव्हाने नमूद केली. सर्वात मोठी समस्या म्हणजे बॅटरी लवकर संपणे. लहान आणि पातळ फोनमध्ये मोठा सॅटेलाइट अँटेना बसवणे कठीण आहे. उपग्रह सिग्नलची ताकद टिकवणे आणि फोर जी-५ जी शी जोडणेही सोपे नाही. काही फोनमध्ये हार्डवेअर बदल करावे लागतील, असे 'गूगल'चे मत आहे.

जगात कुठे सुरू आहे काम?

अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोप आणि कॅनडात या तंत्रज्ञानाची चाचणी सुरू आहे. एलन मस्क यांची कंपनी स्टारलिंक आणि टी-मोबाईल मिळूनकाम करतआहेत. भारतात मात्र मोठ्याप्रमाणावर अंमलबजावणीसाठी अजूनकाहीवर्षे लागूशकतात. डी २ डी तंत्रज्ञानामुळे भारतातीलशेवटच्या व्यक्तीपर्यंत डिजिटल मीडिया पोहोचूशकतो; मात्र 'ॲपल' आणि 'गूगल'च्या चिंतालक्षातघेऊनसरकारनेसावधगिरीनेपुढे जावे, अशी अपेक्षाआहे. नियम, सुरक्षा आणि तांत्रिक तयारीपूर्ण झाल्याशिवाय घाई करू नये.

# व्यवसाय अभ्यासक्रमात तीन महत्त्वाचे प्रकार

मार्गदर्शन

राष्ट्रीय शिक्षण धोरणावर आधारित व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमात व्यवसायांचे तीन महत्त्वाचे प्रकार सांगितले आहेत, सजीवसृष्टीशी संबंधित, यंत्रे व सामुग्रीशी संबंधित आणि मानवी सेवांशी संबंधित कार्ये. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कामाची प्रतिष्ठा, तांत्रिक कौशल्ये आणि विविध जीवनोपयोगी क्षमता विकसित होणे, हे अपेक्षित आहे. नवीन अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना वर्गात बसून केवळ पुस्तकी ज्ञान दिले जाणार नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी दिली जाईल. विद्यार्थ्यांना शेतात काम करणे, यंत्रे हाताळणे, सुतारकाम, धातुकाम, शिवणकाम, शेती, पशुपालन, अन्नप्रक्रिया, संगणक, इलेक्ट्रॉनिक्स आणि विविधतंत्रज्ञानाशी संबंधित उपक्रमांमध्ये सहभागी केले जाईल. त्यामुळे शिक्षण हे प्रत्यक्ष अनुभवाशी जोडले जाईल आणि अधिक जीवनोपयोगी होईल; मात्र पारंपरिक व्यवसाय शिक्षणापेक्षा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यातील व्यवसाय शिक्षण ही संकल्पना वेगळी आहे. एखादा विशिष्ट व्यवसाय प्रकार घेऊन त्यातील कौशल्य विकसन असे इथे अपेक्षित नसून विविध व्यवसायांमध्ये आवश्यक असणाऱ्या मूलभूत क्षमता आणि जीवनकौशल्ये विकसित करणे हा त्याचा हेतू आहे. पुढे दिलेल्या 'परसबाग' प्रकल्पाच्या उदाहरणावरून हे वेगळेपण लक्षात येईल.विद्यार्थ्यांनी 'परसबागेत भाजीपाला तयार करणे' हा प्रकल्प हाती घेतला आहे. अभ्यासक्रमातील अपेक्षेनुसार हा प्रकल्प म्हणजे केवळ बियाणे पेरणे आणि झाडे वाढवणे एवढ्यापुरताच मर्यादित नाही, तर ती एक छोटी प्रयोगशाळाच होणे अपेक्षित आहे. विद्यार्थी एकाच प्रकारच्या भाज्यांची वेगवेगळ्या पद्धतीने लागवड करू शकतात. एका वाफ्यात सेंद्रिय खत तर दुसऱ्या वाफ्यात रासायनिक खत वापरून वाढीतील फरक अभ्यासू शकतात. कमी व जास्त पाण्यामुळे उत्पादनावर होणारा परिणाम, सूर्यप्रकाश व सावलीतील वाढीतील फरक किंवा विविध बियाणांच्या जातींची तुलना असे अनेक प्रयोग 'परसबाग' प्रकल्पात विद्यार्थी करू शकतील, नव्हे त्यांनी ते करावेतच अशीच अपेक्षा आहे. अशा प्रयोगांमधून विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षणशक्ती, संशोधनवृत्ती, नोंदी ठेवणे, निष्कर्ष काढणे आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित होईल. त्याचबरोबर जीवशास्त्र, पर्यावरणशास्त्र, गणित आणि वैज्ञानिक पद्धतीचे ज्ञानही प्रत्यक्ष अनुभवातून मिळेल.



'परसबाग' प्रकल्पामुळे मिळणारे शिक्षण इथेच थांबत नाही. तयार झालेला भाजीपाल्यावरचा खर्च काढणे, विक्री किंमत निश्चित करणे, नफा-तोट्याचा अभ्यास, ग्राहकांशी संवाद आणि विक्री व्यवस्थापन यांचेही शिक्षण मिळणार आहे. म्हणजेच विद्यार्थ्यांना केवळ नोकरीसाठी तयार न करता उद्योजकतेसाठीही सक्षम केले जाईल. एखादी वस्तू तयार करणे, तिची किंमत ठरवणे, विक्रीचे नियोजन करणे आणि व्यवसाय प्रक्रिया समजून घेणे यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढणे आणि रोजगारनिर्मितीची दृष्टी विकसित होणे अपेक्षित आहे. अशा प्रकारे एका छोट्या उपक्रमातून शेती, विज्ञान, गणित, व्यवस्थापन आणि उद्योजकता इ. अनेक विषय एकाच वेळी शिकता येतील. विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षणक्षमता, सर्जनशीलता, नेतृत्व, संवादकौशल्य, संघभावना आणि समस्या सोडविण्याची वृत्ती विकसित होईल. त्याचबरोबर श्रम प्रतिष्ठा, जबाबदारी आणि कामाविषयी आदरही निर्माणहोईल. इथेहेलक्षात घ्यायचेआहे, की 'परसबाग' प्रकल्प विद्यार्थ्यालापरसबागेतील किंवा शेतीतीलतज्ज्ञकरण्याकरितानसूनव्यवसायासाठी आवश्यक किमान मूलभूतकौशल्ये विकसितकरण्यासाठी निवडलेले एक साधनआहे.'एनसीइआरटी'नेसहावी ते आठवी इयत्तांसाठी व्यवसाय शिक्षणाकरिताप्रकाशित केलेले 'कौशल्य बोध' हेपाठ्यपुस्तक पारंपरिक नाही. त्यामध्येशाळांनीव्यवसाय शिक्षणकसेराबवावेहेसमजण्यासाठी उदाहरणादाखलसहाप्रकल्प दिलेआहेत; मात्रशाळांनाआपल्यासामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक परिस्थितीनुसारउपलब्धसाधनसामग्रीच्याआधारेकोणतेहीप्रकल्प निवडण्याचेस्वातंत्र्य आहे. यामुळेव्यवसाय शिक्षणस्थानिक गरजांशी अधिक सुसंगतहोऊ शकते.

# गरमागरम मूगडाळ भजी

झटपट रेसिपी

दोस्तांनो, आता प्रत्येकाला पावसाचे वेधलागले आहेत. रिमझिम पावसात गरमागरम भजीचा आस्वाद घेण्यासारखा दुसरा आनंद नाही. हॉस्टेलमध्ये गप्पांचा फड जमवताना मस्त मूग डाळ भजी समोर असतील तर दोस्तांची मैफल छान रंगेल. मूग डाळ भजीची रेसिपी जाणून घेऊ.

**सामग्री:** अर्धा किलो मूग डाळ,चमचाभर आलं-लसूण पेस्ट, बारीक चिरलेली हिरवी मिरची, चिरलेली कोथिंबिर, अर्धा टी स्पून चाट मसाला, एक चमचा गरम मसाला, चिमूटभर हिंग, मीठ आणि तेल.

**कृती:** मूग डाळ रात्रभर भिजत घाला. सकाळी पाणी काढून मिक्सरमध्ये रवाळ वाटून घ्या. एका भांड्यात काढून त्यात हिंग, गरम मसाला, चाट मसाला, आलं-लसूण पेस्ट, मिरचीचे तुकडे, कोथिंबिर आणि मीठ घालून नीट मिक्स करा. कढईत तेल गरम करा. भजीचं पीठ या तेलात हळूच सोडा. नीट तळून घ्या. सॉस किंवा चटणीसोबत खा.



# आईला नातं मान्य नाही

मॅच मेकिंग


मी २६ वर्षांची तरुणी असून उत्तम करीअर करते आहे. माझ्या वडिलांच्या मद्यपानाच्या व्यसनामुळेआई त्यांच्यापासून वेगळी झाली. तिनेच मला आणि बहिणीला वाढवलं. तारुण्यातही मला वाईट अनुभव आले. नोकरी लागल्यानंतर माझ्या आयुष्याला एक दिशा मिळाली. माझी आई आम्हा बहिणींची खूप काळजी करते. ती थोड्या जुन्या वळणाची आहे. मास्टर्स पदवी मिळवल्यानंतर आईने माझ्यासाठी स्थळं शोधायला सुरूवात केली. लग्नाला माझी ना नव्हती. पण तिने माझ्या पसंतीकडे पूर्ण दुर्लक्ष केलं. तिला योग्य वाटणाऱ्या मुलाशी माझं लग्न लावून द्यायचं होतं. मधल्या काळात मी एका मुलाच्या प्रेमात पडले. दीड वर्ष एकत्र घालवल्यानंतर आईला याबद्दल सांगितलं. पण तिला हे नातं मान्य नाही. तो ख्रिश्चन आणि मी हिंदू आहे. त्यातच तो माझ्यापेक्षा सहा महिन्यांनी लहान आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यामुळे तो माझ्यासाठी योग्य नसल्याचं तिचं म्हणणं आहे. ती माझा मानसिक आणि शारीरिक छळ करते आहे. माझ्यासाठी तोच योग्य असल्याचं अनेकदा समजावूनही ती ऐकत नाही. आमचं नेहमी भांडण होतं. मी काय करू?



उत्तर : आईने तुम्हा दोघा बहिणींना एकटीने वाढवलं. त्यामुळे तिला तुमची खूप काळजी वाटते. तिच्या प्रमाणे तुझं आयुष्य उध्वस्त होऊ नये, असंही तिला वाटत असावं. म्हणूनच तुमच्या लग्नाच्या बाबतीत ती खूपच जपून पावलं टाकत आहे. महत्त्वाचं म्हणजे या मुलाबद्दल तुला खात्री वाटते का, तो तुझा आणि तुझ्या कुटुंबाचा आदर करेल का, याचा विचार कर. आईशी मनमोकळा संवाद साध. या नात्याला तिचा का नकार आहे, हे जाणून घे. हा मुलगा कसा योग्य आहे हे तिला पटवून दे. गरज पडली तर समुपदेशकांची मदत घेता येईल.

# हिमाचलचा लपलेला स्वर्ग

भटकंती



शांत आणि थंड हवेच्या ठिकाणी फिरायला जाण्याचा प्लॅन करत असाल, तर हिमाचल प्रदेशाच्या सुंदर दऱ्यांमध्ये वसलेले शांगढ हे एक उत्तम ठिकाण आहे. हे छोटे पण आकर्षक ठिकाण प्रवासी प्रेमींमध्ये झपाट्याने लोकप्रिय होत आहे. येथील हिरवीगार शेतं, उंच पाइनची झाडं, शांत वातावरण आणि ढगांनी वेढलेले पर्वत भेट देणाऱ्या प्रत्येकाला मोहित करतात, म्हणूनच अनेक जण याला हिमाचलचा लपलेला स्वर्ग म्हणतात. विशेष म्हणजे, 'मिनी थायलंड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिबीपासून शांगढ फक्त तीन तासांच्या अंतरावर आहे. आधीच लोकप्रिय आणि गर्दीने भरलेल्या थंड हवेच्या ठिकाणांपासून दूर, एखाद्या शांत आणि अनोख्या ठिकाणांच्या शोधात असाल, तर तुम्हाला शांगढ नक्कीच आवडेल.

शांगढचे वैशिष्ट्य काय आहे?

शांगढचे सर्वात वैशिष्ट्यपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे त्याचा साधेपणा आणि नैसर्गिक सौंदर्य. हे ठिकाण शहरीही नाही आणि गर्दीनेही गजबजलेले नाही. यामुळेच निसर्गप्रेमी, ट्रेकर्स आणि निवांत सुट्टीच्या शोधात असलेले लोक या ठिकाणाकडे अधिकाधिक आकर्षित होत आहेत.

# आरोग्यदायी पीनट बटर सँडविच

झटपट रेसिपी

मित्रांनो, हॉस्टेलमध्ये आपल्याला काही तरी झटपट बनवायचं असतं. हाताशी फार वेळ नसतो तसंच भांडीही नसतात. दिवसभराच्या धावपळीमुळे थकवा आल्यानंतर शरीराला पोषक घटकही लागतात. अशा वेळी पीनट बटर बनाना सँडविच हा स्वस्तातला मस्त पर्याय आहे.

**साहित्य:** ब्रेड, पिनट बटर, केळ्याचे काप. (केळ्याऐवजी स्ट्रॉबेरी किंवा ब्लूबेरीही वापरता येतील.)

**कृती:** दोन किंवा चार ब्रेड स्लाईस घ्या. चारही स्लाईसच्या एका बाजूला पिनट बटर लावा. आता ब्रेडवर केळ्याचे काप ठेवा. वर दुसरा ब्रेड ठेऊन सँडविच बनवा. आवडत असतील तर ब्रेड टोस्ट करून घ्या. डाळिंब, सफरचंद अशी फळंही घालता येतील. नाश्ता किंवा रात्रीचं जेवण म्हणून तुम्ही हा पदार्थ खाऊ शकता. फळांमधून तुम्हाला भरपूर पोषक घटक मिळतील. तर पिनट बटरही खूप हेल्दी असतं. त्यामुळे अगदी झटपट हेल्दी पदार्थ तयार होतील.






बीड ते मंत्रालय लाँग मार्च अहिल्यानगरमध्ये दाखल झाल्यानंतर स्वागत करण्यात आले.

# अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करण्यासाठी बीड ते मंत्रालय लाँग मार्च अहिल्यानगरमध्ये दाखल

### समस्त आंबेडकरी समाजातर्फे जल्लोषात स्वागत

नगर – अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी बीड ते मंत्रालय, मुंबई दरम्यान सुरू असलेल्या लाँग मार्च अहिल्यानगर शहरांमध्ये दाखल झाले असता लाँग मार्च चे प्रमुख संयोजक सिद्धार्थ शिंगारे यांचा सत्कार करून समस्त भीमसैनिकांनी जल्लोषात स्वागत केले. शहरातील विविध सामाजिक संघटना, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून मार्चला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

नगरसेवक सुरेश बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली मार्च मध्ये सहभागी होणाऱ्या भीमसैनिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

यावेळी हजारो भीमसैनिकांनी एकजुटीचा निर्धार व्यक्त करत उपवर्गीकरणाच्या विरोधातील आंदोलनाला भक्कम पाठिंबा दर्शविला.

यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे, अशोक गायकवाड, सुमेध गायकवाड, निवृत्ती आरू, अमित काळे, प्रा.जयंत गायकवाड, एन एम पवळे, विशाल गायकवाड, भीमराव पगारे, सिद्धार्थ राजगुरू, सिद्धार्थ आढाव, संजय खामकर, महेश भोसले, कौशल गायकवाड, विशाल कांबळे, विशाल भिंगारदिवे, समीर भिंगारदिवे, आदींसह समाज बांधव उपस्थित होता.

# रामदास आठवले यांची बदनामी खपवून घेतली जाणार नाही

### सुनील साळवे यांचा इशारा; उपवर्गीकरणाच्या मुद्यावरून केंद्रीय मंत्र्यांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न; रिपब्लिकन पक्षाचा निषेध



रामदास आठवले

नगर – मागासवर्गीय जातींच्या उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यावर सातत्याने टीका करून त्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)च्या अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने करण्यात आला आहे. केवळ प्रसिद्धी मिळविण्यासाठी काही विघ्नसंतोषी प्रवृत्तींकडून अशा प्रकारचे प्रयत्न होत असून, त्यांचा पक्षाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत असल्याचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांनी म्हटले आहे. तसेच केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्याविरोधात अपप्रचार करणाऱ्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

साळवे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष देशभर पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य रामदास आठवले यांनी केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर केंद्र सरकारमध्ये मंत्रीपद भूषविण्याचा मान मिळालेल्या प्रमुख आंबेडकरी नेत्यांमध्ये रामदास आठवले यांचे नाव घेतले जाते. सलग तीन वेळा केंद्रीय मंत्री म्हणून त्यांनी सामाजिक न्यायासाठी प्रभावीपणे काम केले आहे.

विद्यार्थीदशेपासूनच रामदास आठवले यांनी सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. भारतीय दलित पँथरच्या माध्यमातून राज्यातील विविध भागांमध्ये घडणाऱ्या अन्याय–अत्याचारांविरोधात त्यांनी संघर्ष उभारला. वंचित समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी रात्रंदिवस काम केले. गावोगावी पँथरची चळवळ उभी करून सामाजिक न्यायाचा लढा अधिक व्यापक केला आणि महाराष्ट्रासह देशभर रिपब्लिकन पक्षाची ताकद वाढविण्याचे कार्य केले.

राज्यात सध्या चर्चेत असलेल्या उपवर्गीकरणाच्या मुद्यावरून काही लोक जाणीवपूर्वक रामदास आठवले यांना लक्ष्य करत आहेत. समाजामध्ये संभ्रम निर्माण करून त्यांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप साळवे यांनी केला. प्रत्यक्षात आठवले यांची भूमिका समाजामध्ये फूट पाडण्याची नसून सर्व घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व समाजघटकांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. शिक्षणाशिवाय स्पर्धा परीक्षा, शासकीय सेवा आणि विविध क्षेत्रांतील संधी प्राप्त होऊ शकत नाहीत. आरक्षणाचा लाभ प्रभावीपणे घ्यायचा असेल तर समाजातील प्रत्येक कुटुंबाने शिक्षणाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे, हीच भूमिका रामदास आठवले यांनी सातत्याने मांडली असल्याचे साळवे यांनी नमूद केले.

इतर जातींनी आमचे आरक्षण लाटले असा अपप्रचार करून समाजात भावाभावां–मध्ये भांडणे लावणे, परस्परांविषयी अविश्वास निर्माण करणे किंवा दरी वाढविणे हा प्रश्नांचा मार्ग नसल्याचे त्यांनी सांगितले. त्याऐवजी विद्यार्थ्यांना शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी शैक्षणिक सुविधा, मार्गदर्शन केंद्रे, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, वसतिगृहे आणि शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. समाजाच्या प्रगतीचा खरा मार्ग शिक्षणातूनच जातो, अशी भूमिका रामदास आठवले यांनी घेतली असून रिपब्लिकन पक्ष त्याच विचारांवर कार्यरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आंबेडकरी चळवळीत कार्यरत असलेल्या सर्व गट–तटांतील नेत्यांचा आदर करण्याचे संस्कार रामदास आठवले यांनी आपल्या कार्यकर्त्यांना दिले आहेत. त्यामुळे रिपब्लिकन पक्ष कोणत्याही नेत्यावर वैयक्तिक टीका करत नाही. मात्र, जाणीवपूर्वक बदनामी करणाऱ्या प्रवृत्तींचा निषेध करण्यात येत असून भविष्यात असे केविलवाणे प्रयत्न टाळावेत, असे आवाहनही साळवे यांनी केले.

संघर्षातून उभ्या राहिलेल्या नेतृत्वावर टीका करून कोणीही मोठे होऊ शकत नाही. समाजहितासाठी कार्य करणाऱ्या नेत्यांची बदनामी करण्याऐवजी समाजाच्या शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीसाठी सकारात्मक भूमिका घेणे हीच काळाची गरज असल्याचे साळवे यांनी म्हंटले आहे.

# वाढत्या घरफोडी, चोरी आणि चोरट्यांच्या दहशतीबाबत तात्काळ कठोर कारवाई करा

### कल्याण रोड येथील गणेशनगर येथे गस्ती वाढवावी पोलिस अधीक्षकांना नागरिकांचे निवेदन



गणेशनगर येथे गस्ती वाढवावी, या मागणीचे निवेदन पोलिस अधीक्षकांना देताना नागरिक.

नगर – कल्याण रोड, गणेशनगर परिसरात मागील काही महिन्यांपासून घरफोडी, चोरी तसेच चोरीच्या प्रयत्नांच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. ५ जून रोजी याच विषयासंदर्भात गणेशनगर भागातील नागरिकांनी तोफखाना पोलीस स्टेशन मध्ये लेखी निवेदन व संबंधित घटनेचे सिसिटीव्ही फुटेज दिले होते. तथापि, त्या निवेदनावर अद्यापपर्यंत कोणतीही प्रभावी कार्यवाही झालेली दिसून आलेली नाही. उलट त्यानंतर देखील सदर परिसरात चोरट्यांकडून तीन ते चार वेळा रेकी करुन चोरीचे प्रयत्न करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

कल्याण रोड येथील गणेशनगर भागातील नागरिकांच्या वतीने वाढत्या घरफोडी, चोरी व चोरट्यांच्या दहशतीबाबत तात्काळ कठोर कारवाई करणे बाबत जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना निवेदन देण्यात आले. यावेळी गणेशनगर सोसायटीचे चेअरमन गणेश शिंदे, स्वप्निल अंकम, सुरेश मिसाळ, नाना देवतरसे, योगेश दिवाने, अनिल राऊत, पोपट शेळके, विशाल माने, अमोल भांबरकर, अर्जुन नेवसे, रमेश बोल्ली, विठ्ठल आलवाल, महेश शिरसुल, गणेश चिलका, राजू तेल्ला, संजय वाघस्कर, महादेव पिसाळ, प्रमोद तेल्ला, तुषार इरुळे, राधाकिसन अवधूत आदी उपस्थित होते.

सदर चोरटे मध्यरात्रीच्या सुमारास गणेशनगर परिसरात धुमाकूळ घालत असून अनेक रहिवाशांनी त्यांना प्रत्यक्ष पाहिले आहे. त्यांच्या हातात तलवारी, कोयते, कुऱ्हाडी तसेच इतर घातक शस्त्रे असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले आहे. हे चोरटे घरांचे दरवाजे, खिडक्यांचे गज व इतर सुरक्षा साधने कापून घरामध्ये जबरदस्तीने प्रवेश करण्याचा प्रयत्न करतात.काही ठिकाणी त्यांनी घरफोडी करण्याच्या उद्देशाने दरवाजे व खिडक्यांची तोडफोड केल्याचेही आढळून आले आहे.

विशेष म्हणजे हे चोरटे बहुतांश वेळा विना क्रमांकाच्या नसलेल्या चारचाकी वाहनांमधून येत असल्याचा दाट संशय आहे. चोरी करण्यापूर्वी परिसरात रेकी करून योग्य संधी साधून घरफोडी केली जात असल्याने नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.भविष्यात कोणतीही गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या प्रकरणाची पोलीस प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन गणेशनगर परिसरात नियमित व वाढीव पोलीस गस्त, संशयित व्यक्तींवर विशेष लक्ष, रात्रीच्या वेळी गस्ती पथकांची नियुक्ती तसेच परिसरातील नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने या प्रकरणात तातडीने प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# अहिल्यानगर मध्ये आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिन उत्साहात साजरा



अहिल्यानगरमध्ये आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिन साजरा करण्यात आला.

नगर – श्री रामावतार मानधना चारिटेबल ट्रस्ट संचलित महावीर मल्लखांब आणि योगा ट्रेनिंग सेंटर मध्ये जागतिक मल्लखांब दिवस साजरा करण्यात आला. अहिल्यानगर शहरात गेल्या पंधरा वर्षापासून या सेंटर मार्फत मल्लखांबातील अनेक खेळाडू घडवण्याचे कार्य अविरत सुरू आहे. वय वर्ष पाच पासून ते महाविद्यालयीन तरुण तरुणीसह शेकडो विद्यार्थी रोज या मैदानावर मल्लखांब या आपल्या पारंपारिक खेळाचा सराव करतात, यामध्ये पुरलेला मल्लखांब टांगता मल्लखांब दोरीचा मल्लखांब अशा विविध साधनांवर सराव केला जातो. या प्रसंगी ट्रस्ट चे ट्रस्टी मोहन मानधना, राष्ट्रीय प्रशिक्षक उमेश झोटिंग यांच्या हस्ते मल्लखांबाचे पूजन करण्यात आले, मुलांच्या सुदृढ आयुष्यासाठी दररोज मल्लखांबाचा सराव केला पाहिजे, आज या मैदानामुळे मुले मोबाईल टीव्ही पासून दूर राहतात याचाच सर्व पालकांना आनंद होत आहे, तसेच या देशी खेळांमुळे होणारे फायदे याचे महत्त्व सांगत मोहन मानधना यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी सेंटरचे राष्ट्रीय प्रशिक्षक सौ. प्रणिता तरोटे– कवडे, आप्पा लाडाने, अक्षय पावडे आदींसह शेकडो विद्यार्थी व पालक उपस्थित होते. यावेळी मल्लखांबाचे सुंदर असे प्रात्यक्षिक मुलांनी सादर केले.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेला प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकत विद्यमान मालक **१. इशरतजहाँ महम्मद अय्युब शेख** रा.करशेठजी रोड,रामचंद्र खुंट, अ.नगर., **२. फरतजहॉ सगीर बागबान** रा. १०१०, रविवार पेठ,लक्ष्मी रोड, सुभानअल्ला हॉटेल मागे,पुणे. यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदर मिळकतीचे विक्री करण्याचा करार करून आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याबाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, सदर मिळकतीबाबत कोणतेही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत,गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट व त्यावरील बांधकाम ासह मिळकतीचे खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** – जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे **भिंगार** येथील प्लॉट व त्यावरील बांधकामासह रो–हाऊस मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| अ) स.नं. | प्लॉट नं. | चौ.मीटर |
|---|---|---|
| ३२१/४अ | ९ | ४३.६८ |

**सदर प्लॉटवर मंजूर प्लॅन प्रमाणे बांधकाम झालेल्या गजानन रो–हाऊस स्किम (विर्सजीत) मधील विद्यमान मालक नं.१ यांचे मालकीचा रो–ब्लॉक नं. ९/२ याचे प्लॉटचे क्षेत्र ४३.६८ चौ.मी. असून सदर प्लॉटवर लोडबेअरींगमध्ये बांधकाम झालेले असून बांधकाम क्षेत्र १८.५८ चौ.मी. मिळकतीबाबत. यांसी चतुःसिमा** – पुर्वेस – अंतर्गत रहदारीचा रस्ता, दक्षिणेस – ब्लॉक नं.९/१ (रफिक उस्मान शेख) पश्चिमेस – ड्रेनेज लाईन (छोटी बोळ), उत्तरेस – ब्लॉक नं.९/३

| ब) स.नं. | प्लॉट नं. | चौ.मीटर |
|---|---|---|
| ३२१/४अ | ९ | ४३.६८ |

**सदर प्लॉटवर मंजूर प्लॅन प्रमाणे बांधकाम झालेल्या गजानन रो–हाऊस स्किम (विर्सजीत) मधील विद्यमान मालक नं. २ यांचे मालकीचा रो–ब्लॉक नं. ९/३ याचे प्लॉटचे क्षेत्र ४३.६८ चौ.मी. असून सदर प्लॉटवर लोडबेअरींगमध्ये बांधकाम झालेले असून बांधकाम क्षेत्र १८.५८ चौ.मी. मिळकतीबाबत.**
**यांसी चतुःसिमा** – पुर्वेस – अंतर्गत रहदारीचा रस्ता, दक्षिणेस – ब्लॉक नं.९/२
पश्चिमेस – ड्रेनेज लाईन (छोटी बोळ), उत्तरेस – ब्लॉक नं.९/४
दि.१६/०६/२०२६, अहमदनगर.

**अ‍ॅड. नाजीम अहमद इस्माईल शेख। कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफिसशेजारी,डावरेगल्ली,अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही विद्यमान मालक **मथुरा दिलीप भागवत रा. ८५०, बागडपट्टी,अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची आहे सदर मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमूद केलेल्या मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे. असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद मिळकतबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणून दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन** :– डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे सावेडी** येथील सर्व्हे नं. ३५/२अ/२ब मधील प्लॉट नं. ८१ याचे एकूण क्षेत्रफळ ६९.०० चौ.मी. हा संपूर्ण प्लॉट. **यांसी चतुःसिमा** :–

पुर्व :– प्लॉट नंबर ८२, दक्षिण :– ६.०० मी. रुंदीचा रस्ता
पश्चिम :– ६.०० मी. रुंदीचा रस्ता, उत्तर :– प्लॉट नंबर ८०

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणूक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

**अ‍ॅड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**अ‍ॅड. ओंकार पंडीत मोरे**
आहिल्यानगर, मो. नं. ९८६०६४६४६३, ऑफिस : गाळा नं. ४,
दि.१६/०६/२०२६ महालक्ष्मी चेंबर्स, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# एकल महिला धोरणासाठी १८ जून रोजी कार्यशाळा

नगर – एकल महिला धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख व वास्तवाधिष्ठित करण्याच्या उद्देशाने नागरिक, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, तज्ज्ञ व्यक्ती तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांचे अभिप्राय व सूचना जाणून घेण्यासाठी १८ जून रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, जिल्हा परिषद, अहिल्यानगर येथे जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय कदम यांनी दिली.

महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात येणाऱ्या या कार्यशाळेत जिल्ह्यातील एकल महिलांशी संबंधित विविध प्रश्न व समस्यांवर चर्चा करण्यात येणार आहे. तसेच शासकीय योजनांचा लाभ, सामाजिक व आर्थिक सक्षमीकरण, आरोग्य, सुरक्षा, पुनर्वसन तसेच रोजगाराच्या संधींसंदर्भात विचारमंथन होणार आहे.

कार्यशाळेत नागरिक, एकल महिला, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, तज्ज्ञ व्यक्ती तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून आपल्या सूचना व अभिप्राय नोंदवावेत.

# कामगारांच्या हक्कांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

### 'समान काम, समान वेतन'ची अंमलबजावणी करण्याची मागणी; कामगार कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर कारवाईचा आग्रह



कामगारांच्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसलेले सह्याद्री छावा संघटनेचे कार्यकर्ते.

नगर – अहिल्यानगर शहरातील कामगारांची आर्थिक लूट व पिळवणूक होत असताना संबंधित यंत्रणा मात्र त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण आंदोलन करण्यात आले. कामगार कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर तातडीने कारवाई करून कामगारांना त्यांच्या हक्कांचे संरक्षण मिळावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. या उपोषणात अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, दत्ता वामन, श्रीधर शेलार, विजय वहाडणे, सुभाष काकडे, बबन शिंदे, बाजीराव कलढोणे, राजकुमार पासवान, हरीओम राजपूत, संदीप राजपूत, महेश गुंजकर, राम भोर, अरविंद चौधरी, शंभू यादव, दिनेश यादव, कृष्णा कुमार, चंद्रकांत मगर, कैलास शर्मा, सुधाकर यादव, रवींद्र राजपूत, अरविंद राजपूत यांच्यासह कामगार सहभागी झाले होते.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी आरोप केला की, शहरातील अनेक उद्योग व कंपन्यांमध्ये कामगारांचे विविध प्रकारे शोषण केले जात असून त्यांची आर्थिक पिळवणूक सुरू आहे. मात्र, या गंभीर बाबींकडे सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाकडून सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी व निवेदने सादर करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. उलट जबाबदारीची टाळाटाळ करून कारवाईसाठी दिरंगाई केली जात असल्याचा आरोप संघटनेने केला.

संघटनेच्या वतीने कंपन्यांविरोधात तक्रारी दाखल करण्यात आल्याचेही आंदोलनकर्त्यांनी सांगितले. या कंपन्यांमध्ये कामगार कायद्यांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप करत त्याची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

उत्पादन प्रक्रियेत कायमस्वरूपी कामगार आणि कंत्राटी कामगार एकाच प्रकारचे काम करत असतानाही त्यांच्या वेतनामध्ये मोठी तफावत आहे. सर्वोच्च न्यायालयाने 'समान काम, समान वेतन' या तत्त्वाची स्पष्टपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिलेले असतानाही अनेक कंपन्यांमध्ये या आदेशाचे पालन केले जात नाही. त्यामुळे समान स्वरूपाचे काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांप्रमाणेच वेतन मिळावे, अशी प्रमुख मागणी संघटनेने केली आहे.

याशिवाय कंत्राटी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी (पीएफ) संदर्भातील नियमांचे काटेकोर पालन करण्यात यावे, त्यांच्या वेतनातून होणाऱ्या कपातींबाबत पारदर्शकता ठेवावी व सर्व कामगारांना कायदेशीर हक्क व सामाजिक सुरक्षा लाभ मिळावेत, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली दुकान (शॉप) मिळकत ही विद्यमान मालक **सद्गुरु कन्स्ट्रक्शनचे प्रोप्रा. रेखा भिमराव पवार रा. पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची आहे. सदर दुकान मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या दुकान मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला आहे. सदर दुकान मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद दुकान (शॉप) मिळकत बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा **साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास** ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या नकलासह आम्हांस कळवावे व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीव पूर्वक सोडून दिलेले आहे असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार करतील व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-**

डि।। अहिल्यानगर सब डि ।। व ता. नगर पैकी जिल्हा परिषद हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे बुऱ्हाणनगर येथील सर्व्हे नं. ६३/१+२+३ब मधील प्लॉट नं. १३अ यांचे एकूण क्षेत्रफळ ५९४.०० चौ. मी. यांवर बांधकाम केलेल्या सदगुरु पॅलेस' या अपार्टमेंट मधील ग्राउंड फ्लोअर वरील शॉप नं. ७ याचे बांधकाम क्षेत्रफळ ६.८४ चौ. मी. ( कारपेट एरिया ५. ९९ चौ. मी. ) + स्टोअर नं. १सी याचे बांधकाम क्षेत्र ९.५९ चौ. मी. ( कारपेट एरिया ८.७० चौ. मी.) असे एकुण बांधकाम क्षेत्र १६.४३ चौ. मी. ही संपूर्ण मिळकत.**

**यांसी चतु:सिमा :-**
पुर्वेस – ९ मी. रस्ता, दक्षिणेस – शॉप नं.६,
पश्चिमेस – स्टोअर, उत्तरेस – शॉप नं.८,

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

**अ‍ॅड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**अ‍ॅड. ओंकार पंडीत मोरे**
मो नं. ९८६०६४६४६३,
अहिल्यानगर ऑफीस – महालक्ष्मी चेंबर्स, मोरया मंगल कार्यालयासमोर,
दिनांक :– १६/०६/२०२६ पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मिळकतीबद्दल विद्यमान मालक यांनी विक्रीचा व्यवहार आमचे अशिलाबरोबर ठरविलेला आहे. सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास बक्षीसपत्र, अब्बल जप्ती, बँक, वित्तीय संस्था अगर सोसायटीचा कर्ज बोजा नाही जामिन तारण नाही तसेच सदर मिळकतीबाबत भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **७ दिवसांचे आत** खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिद्धीस दिली.

**- मिळकत वर्णन -**

जिल्हा अहिल्यानगर पोटतुकडी नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे माळीवाडा येथील सर्व्हे नं. ७३ मधील प्लॉट नं.६ यांचे एकुण क्षेत्रफळ १६३.८८ चौ.मी यावर बांधलेले ट्विन बंगली पैकी दक्षिण बाजूकडील बंगलो नं ६/१ चे प्लॉट क्षेत्र ८१.९४ चौ.मी व यावरील आर सी सी स्ट्रक्चर मधील तळमजल्यावरील बांधकाम क्षेत्र ४१.४३५ चौ.मी व पहिला मजल्यावरील बांधकाम क्षेत्र ४४.०१ चौ.मी अशी एकुण बांधकाम क्षेत्र ८५.४४५ चौ.मी यांसी चतुःसिमा **पुर्वेस** : सर्व्हे नं. ७०, **दक्षिणेस** : प्लॉट नं.७ **पश्चिमेस** : ९ मीटर रुंदीचा रस्ता **उत्तरेस** : सर्व्हे नं. ७३ प्लॉट नं. ६ मधील बंगलो नं. ६/१

विद्यमान मालक : विश्वेश्वर विठ्ठल रत्नवरे रा कपिलेश्वर नगर, मार्केट यार्ड मागे, सारस नगर, अहिल्यानगर

**अ‍ॅड. उषा राजाराम जगदाळे (पटेल)**
पत्ता हऊ श्री बंगलो, आदर्श कॉलनी,
एच डी एफ सी बँक जवळ,
अहमदनगर प्रोफेसर चौक, सावेडी, अहमदनगर
दिनांक :– १६/०६/२०२६ मो नं. ८८८८८८८१९९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलाबरोबर ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **७ दिवसांचे आत** खालील पत्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**ता.१५/०६/२०२६ रोजी सदर मिळकतीबाबत नोटीस प्रसिद्धीस दिली होती, त्यातील एक नाव नोटीसीमध्ये लिहिण्याचे राहुन गेल्यामुळे आज ता. १६/६/२०२६ रोजी सदरचे शुद्धीपत्र प्रसिद्धीस देत आहे.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन** – जिल्हा अहमदनगर, पोततुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील, **मौजे अहिल्यानगर शहरनगर येथील** खालील वर्णनाची मिळकत –

| सि.स.नं. | म्यु.घ.नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ३५४५/२अ | ७२८३ | ५१.८० चौ.मी. |

यापैकी पश्चिमेकडील बाजुची मिळकत त्याचे क्षेत्र २२.६० चौ.मी. असून यातील बांधकामासह

**यांसी चतु:सीमा** –
पूर्वेस : नं.म.पैकी मिळकत व समाईक जीना दक्षिणेस : इमारत कंपनीची जागा
पश्चिमेस : शिंदे यांची मिळकत उत्तरेस : मिळकतीमधील समाईक वापरावयाची बोळ

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक-**
१. महंमद कासम अरशीद रंगरेज २. कनिस फातेमा सुलेमान रंगरेज
३. इम्रान सुलेमान रंगरेज ४. हिना जावीद अली रंगरेज ५. सज्जाद सुलेमान रंगरेज
दि.१६/०६/२०२६ **अ‍ॅड. ए.जे. शेख** (बीएसएल, एलएलबी)
अहमदनगर. पराग बिल्डींग, जुन्या जिल्हाधिकारी कार्यालया जवळ, अहमदनगर

